**सुविचार**

स्वयं के प्रति स्वमान व प्रभु के प्रति प्रेमभाव होने से दूसरों को आदर देना सहज हो जाता है ।

(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/सोमवार दि. ११ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-११८ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# देशात समानतेसाठी बंधुभाव गरजेचा

बिकानेर : भारताचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी सांगितले की, देशात समानता राखण्यासाठी बंधुभाव खूप महत्त्वाचा आहे. संविधानाच्या भावनेनुसार आपण एकमेकांचा आदर केला पाहिजे. लोक आपापसांत भांडले तर देशाची प्रगती कशी होईल? सीजेआय चंद्रचूड बिकानेरच्या हमारा संविधान, हमारा सन्मान कार्यक्रमात सहभागी झाले होते.

मानवी प्रतिष्ठेला सर्वोच्च स्थान आहे असे संविधान रचणा-यांचे मत होते, असेहि सरन्यायाधीश म्हणाले. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात न्याय, स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांसह बंधुत्व आणि व्यक्तीचा सन्मान राखला जाईल याची खात्री केली होती. न्याय मंत्रालयाने महाराजा गंगा सिंग युनिव्हर्सिटी, बिकानेरच्या सभागृहात आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात सरन्यायाधीश म्हणाले की, मी अनेकदा पाहतो की लोक त्यांच्या कनिष्ठांकडे आदराने पाहत नाहीत. ड्रायव्हरशी नम्रपणे



बोलत नाही. लोकांना वाटते की ड्रायव्हर लहान आहे. ते क्लिनरकडे इन्फिरिऑरिटी कॉम्प्लेक्सने पाहतात. कोणतीहि व्यक्ती कमी दर्जाची असू शकते पण त्या व्यक्तीलाहि आपल्यासारखेच महत्त्व आहे. सुप्रीम कोर्टात एक पोस्ट आहे. ज्याला १९५० पासून जमादार म्हणतात. ७५ वर्षांपासून त्यांना जमादार म्हटले जात होते, आता त्यांचे नाव बदलण्यात आले आहे.

सीजेआय म्हणाले की, लोकशाही आणि संविधानाचा संबंध आहे. संविधान समजून घेतल्याने लोकशाहीची समजहि विकसित होते. संविधानाचा संदेश प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. संविधानाचा आत्मा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवावा लागेल.

सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड म्हणाले की देशातील कोणत्याहि न्यायालयात निर्णय स्थानिक भाषेत दिला पाहिजे. मी दिल्लीत बसून वकिलासाठी किंवा न्यायाधीशांसाठी निर्णय देत असेल तर तो अवघड भाषेत असेल, पण मी सामान्यांसाठी निर्णय देत असेल तर तो नक्कीच सोप्या भाषेत असावा. देशातील जिल्हास्तरीय न्यायालयाच्या इमारतींमध्ये सुधारणा व्हायला हव्यात. ही इमारत आधुनिक दर्जाची असावी.

# उद्धव ठाकरेंच्या घोषणेने आघाडीत बिघाडी

मुंबई : एकीकडे महाविकास आघाडीत जागावाटपाचा निर्णय अंतिम टप्प्यात असून, दुसरीकडे उद्धव ठाकरे यांनी केलेल्या एका घोषणेवरून आघाडीत बिघाडी होते की काय अशी चर्चा पाहायला मिळत आहे.

उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघातून उद्धव ठाकरे यांनी अमोल कीर्तिकर यांची उमेदवारी जाहिर केल्याने काँग्रेस नेत्यांमध्ये नाराजी पाहायला मिळत आहे. आधी संजय निरुपम आणि आता वर्षा गायकवाड यांनी ट्वीट करत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. महाविकास आघाडीची चर्चा अजून सुरू असून, ती अंतिम टप्प्यात आहे. निर्णय अद्याप झालेला नाही, असे गायकवाड म्हणाल्या आहेत. तर, निरुपम यांनी थेट आक्रमक भूमिका घेतली आहे.

उद्धव ठाकरे यांनी अमोल कीर्तिकर यांची उमेदवारीची घोषणा केल्याने, याच



उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसकडून इच्छुक असलेल्या संजय निरुपम यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच, महाविकास आघाडीचे जे नेते आहेत, त्यांना माझा प्रश्न आहे की, आतापर्यंत दोन डझन बैठका महाविकास आघाडीच्या झाल्या आहेत. ८ ते ९ जागांवर अजूनहि निर्णय झाला नाही. त्यात उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघाची जागा आहे, यावर निर्णय झाला नाही. असे असताना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे नागरदास रोड अंधेरी येथील शाखेत येतात आणि अमोल कीर्तिकर यांची उमेदवारी जाहिर करतात. ज्या जागेवर अजून निर्णय झाला नाही, ती जागा जाहिर केली जाते. त्यामुळे महाविकास आघाडी धर्म पाळला जात नाही, असे निरुपम म्हणाले.

**महाविकास आघाडीची चर्चा अजून सुरू : वर्षा गायकवाड**

दरम्यान यावरूनच वर्षा गायकवाड यांनी ट्वीट करत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी ट्वीट करत म्हटले आहे की, मुंबईतील लोकसभा मतदारसंघाच्या जागांच्या वाटपासंदर्भात हे नमूद करू इच्छिते की, महाविकास आघाडीची चर्चा अजून सुरू असून ती अंतिम टप्प्यात आहे. निर्णय अद्याप झालेला नाही, असे वर्षा गायकवाड म्हणाल्या आहेत.

**उमेदवारीची घोषणा मागे घ्या: निरुपम**

मी शिवसेना पक्षावर आरोप करत नाही. मी फक्त हे सांगतोय, जर खिचडी घोटाळ्यात यांचे नाव असेल, तर त्यांचा प्रचार शिवसेना आणि काँग्रेस कार्यकर्त्यांना (पान ७ वर)

# भाजप खासदार ब्रिजेंद्र सिंह यांचा पक्षाला रामराम

चंदीगड / हिसारमधील भाजप खासदार ब्रिजेंद्र सिंह यांनी पक्षाला रामराम ठोकला आहे. त्यांनी एक्स मीडियावर



पोस्ट करुन यासंदर्भातील माहिती दिली आहे. त्यांनी सांगितलंय की, राजकीय कारणासाठी भाजप पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.

ब्रिजेंद्र सिंह आपल्या पोस्टमध्ये म्हणालेत की, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी मला हिसार लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून सेवा करण्याची संधी दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. ब्रिजेंद्र सिंह गेल्या काही दिवसांपासून पक्षावर नाराज असल्याचं सांगितलं जातं. त्यामुळे त्यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

ब्रिजेंद्र सिंह हे काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची दाट शक्यता आहे. माजी केंद्रीय मंत्री बिरेंद्र सिंह आणि भाजप खासदार ब्रिजेंद्र सिंह हे दिल्लीमध्ये काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी पोहोचले आहेत. त्यांच्याशी चर्चा करुन पुढील निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. हरियाणात लोकसभेच्या (पान ७ वर)

# बदनामीकारक पोस्टची जबाबदारी घ्या

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीचा माहोल तयार झाला आहे. सोशल माध्यमावर पक्षांचे मिम्स, कोट, नेत्यांबद्दलचे किस्से अशा काही मनोरंजक तर कांही बदनामीकारक पोस्ट व्हायरल होत आहेत. यातील अनेक पोस्ट या फेक आहेत. मात्र, पोस्ट करणारे त्याची खातरजमा न करता त्या पोस्ट शेअर करत आहेत. त्यातहि सत्ताधारी सरकारविरोधात अनेक जण उघडपणे पोस्ट करत आहेत. यात ज्याप्रमाणे विरोधी पक्षांचे लोक आहेत त्याचप्रमाणे सामान्य जनताहि आहे. सोशल माध्यमावर होणारा हा अपप्रचार रोखण्यासाठी आता केंद्राने कठोर पावले उचलली आहेत.

केंद्रीय माहिती व तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी गुगल, फेसबुक, मेटा आणि मायक्रोसॉफ्ट या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या कामकाजावर जाहीर नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले की सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आता कांहीहि पोस्ट करणे शक्य होणार नाही.

मेटा, गुगल, अ‍ॅमेझॉन आणि मायक्रोसॉफ्टला संबोधित करताना ते म्हणाले की, सर्व सोशल मीडिया कंपन्यांना त्यांची जबाबदारी पार पाडावी लागेल. त्यांच्या प्लॅटफॉर्मवर काय पोस्ट आहे आणि काय नाही हे त्यांना पाहावे लागेल.

**सोशल मीडियासाठी नवीन कायदा येणार**

सोशल मीडिया कंपन्यांची हलगर्जी वृत्ती आता सहन केली जाणार नाही, असे स्पष्ट करून ते पुढे म्हणाले. त्यांच्या व्यासपिठावर जे जे कांही प्रकाशित होईल ती त्यांची जबाबदारी असेल. चुकीची माहिती आणि बातम्यांना सामोरे जाण्यासाठी त्यांना तांत्रिक उपाय शोधावे लागतील. जेणेकरून समाज आणि लोकशाहीचे नुकसान होणार नाही. त्याचप्रमाणे डीप फेक्स आणि फेक न्यूजला सामोरे जाण्यासाठी कायदेशीर चौकट निवडणुकीनंतर लागू केली जाईल, असेही मंत्री अश्विनी वैष्णव यांनी जाहीर केले.

**सोशल मीडियाच्या जलद वापराची भीती**

सोशल मीडियावर फिरणाऱ्या फेक न्यूज आणि डीप फेक्सबाबत आता सहनशीलतेचे धोरण स्विकारणार नाही. यासोबतच एआय मॉडेल तयार करण्यासाठी सरकारची परवानगी घ्यावी लागेल. सुमारे २ आठवड्यांपूर्वी गुगलच्या जेमिनी एआय टूलने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल चुकीची बातमी (पान ७ वर)

# क्रिस्टिना पिस्कोव्हाने जिंकला २०२४ चा विश्व सुंदरी किताब

मुंबई : चेक गणराज्याच्या क्रिस्टिना पिस्कोव्हाने ७१ वा मिस वर्ल्ड चा (विश्व सुंदरी) किताब पटकावला आहे. ९ मार्च रोजी मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये विश्व सुंदरी सोहळ्याच्या अंतिम फेरीचे आयोजन करण्यात आले होते, यात क्रिस्टीनाने विश्व सुंदरीचा किताब जिंकला आणि विजेतेपदाच्या मुकुटावर आपले नाव कोरले. यावर्षी १२० स्पर्धकांनी सौंदर्य स्पर्धेत भाग घेतला होता. क्रिस्टीनाने १२० स्पर्धकांना मागे टाकत मिस वर्ल्डचा किताब पटकावला. तर भारताच्या सिनी शेट्टीचे स्वप्न भंगले.




दरम्यान, या स्पर्धेत भारताकडून सिनी शेट्टी या सौंदर्यवतीचाही सहभाग होता. मात्र, विजेतेपदाच्या जवळ आल्यानंतर ती शर्यतीतून बाहेर पडली. ती टॉप-८ मध्ये स्थान मिळवण्यास यशस्वी झाली मात्र, टॉप-४ स्पर्धकांमध्ये तिला स्थान मिळवता आले नाही. सिनीचा जन्म कर्नाटकात झाला असून तिचे शिक्षण मुंबईत झाले. तिने २०२२ मध्ये फेमिना मिस इंडियाचा किताब पटकावला आहे. काल झालेल्या या स्पर्धेत जगभरातील फॅशन उद्योगातील आणि मनोरंजन क्षेत्रातील दिग्गजांनी हजेरी लावली होती.

करण जोहरने केले सूत्रसंचालन विश्व सुंदरी २०२४ च्या शानदार आयोजन सोहळ्यात भारताचा प्रसिध्द निर्माता आणि दिग्दर्शक करण जोहरने उत्तमरीत्या सूत्रसंचालन केले. करण जोहरसोबत मिस वर्ल्ड २०१३ फिलिपिन्सची मेगन यंग. याशिवाय नेहा कक्कर आणि तिचा भाऊ टोनीसह प्रसिद्ध (पान ७ वर)

# ईडीने लालू प्रसाद यादव यांचे निकटवर्तीय सुभाष यादव यांना केली अटक

नवी दिल्ली- लालू प्रसाद यादव यांचे निकटवर्तीय असणाऱ्या सुभाष यादव यांच्याशी संबंधित व्यवसायासंदर्भात पाटण्यातील आठ वेगवेगळ्या ठिकाणी काल छापे टाकले होते. यातून ईडीच्या पथकाने दोन कोटी रुपये रोख आणि गुंतवणूक आणि जमिनीशी संबंधित अनेक महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली. यानंतर काल रात्री उशिरा ईडीने सुभाष यादव यांना अटक केली.

मिळालेल्या माहितीनुसार, अंमलबजावणीसंचालनालयाच्या पथकाने सुभाष यादव यांना शनिवारी रात्री उशिरा पाटण्यातील त्यांच्या राहत्या



घरातून अटक केली. त्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. सोमवारी त्यांना पाटणा येथील बेऊर कारागृहात हलवण्याची तयारी सुरू आहे.

सुभाष यादव यांनी २०१९ ची लोकसभा निवडणूकही आरजेडीच्या तिकिटावर लढवली होती. त्यांच्यावर पाटण्यात अवैध वाळू उत्खनन केल्याप्रकरणी गुन्हे दाखल आहेत. आयकर विभागानेही त्यांच्या जागेवर अनेकदा छापे टाकले आहेत.

माहितीनुसार, सोमवारी ईडीची टीम पाटणा येथील ईडीच्या विशेष न्यायालयात रिमांडबाबत अपील करणार असून सुभाष यादव यांना रिमांडवर घेण्याची मागणी करणार आहे. सुभाष यांना न्यायालयीन कोठडीतून ताब्यात घेण्यासाठी ईडी अपील करणार आहे. यानंतर तपास यंत्रणा सुभाष यादव यांना आपल्या ताब्यात घेईल (पान ७ वर)

# मोदी पंतप्रधान झाले की मी पुन्हा मंत्री होणार

छ. संभाजीनगर : नरेंद्र मोदी अनेकदा मुंबईत आले आहेत. भारत सरकारच्या वतीने हजारो कोटींची मदत मुंबई आणि महाराष्ट्राला दिली आहे. त्यामुळे २०२४ च्या निवडणुकीत नक्कीच नरेंद्र मोदी पंतप्रधान होणार आहेत आणि नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले, की मी मंत्री होणार हे सत्य आहे, निश्चित आहे, असा मोठा विश्वास केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला.



मुंबईत एका कार्यक्रमात बोलताना रामदास आठवले यांनी पुन्हा एकदा मंत्री होण्याबाबत दावा केला. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतून कमीत कमी दोन जागा मिळाव्यात, यासाठी रामदास आठवले आग्रही आहेत. अवघ्या काही दिवसांत लोकसभा निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. जागावाटप आणि उमेदवारी यांवरून अनेक तर्क-वितर्क लढवले जात आहेत. यातच रामदास आठवले यांनी मंत्रिपदाबाबत सदर दावा केला आहे.

संविधानाचे संरक्षण करण्यासाठी (पान ७ वर)

# मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचा १२ रोजी पंतप्रधान मोदी यांचे हस्ते लोकार्पण सोहळा

लातूर:-मराठवाड्यासारख्या मागास भागामध्ये मोठे उद्योग यावेत या दृष्टीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून देशातील चौथा आणि महाराष्ट्रातील पहिला रेल्वे बोगी निर्मिती कारखाना बनवण्याचा निर्णय झाला. याचा शुभारंभ येत्या १२ तारखेला होणार आहे. नरेंद्र मोदी हे अहमदाबाद येथून ऑनलाइन पद्धतीने शुभारंभ करणार आहेत.

लातूरच्या विस्तारित औद्योगिक वसाहतीमध्ये ३५० एकर मध्ये भव्य दिव्य अशा मराठवाडा रेल्वे कोच बनवण्याचा कारखाना उभारण्यात आला. ज्यामधून दरवर्षी २५० वंदे भारत रेल्वेचे कोच तयार होणार आहेत. या कारखान्यामुळे




लातूर जिल्ह्यातील युवकांच्या रोजगाराची स्वप्नपूर्ती होणार असून ङ्गसबका साथ सबका विकासङ्ग हे उद्दिष्टही साध्य होतेय. या मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचा लोकार्पण सोहळा माझ्या सततच्या पाठपुराव्यामुळे दि. १२ मार्च २०२४ रोजी सकाळी ८ वाजता फॅक्टरीच्या आवारात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने आयोजित केलेला आहे.

लातूर लोकसभेचा खासदार सुधाकर शृंगारे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री . अमितभाई शहा, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री. रावसाहेब दानवे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदींसह सर्व मान्यवरांचेही आभार मानले आहेत. या भव्य दिव्य अशा कोच फॅक्टरीचे लोकार्पण कार्यक्रमात सर्व लातूर लोकसभेतील जनतेने या नेत्रदीपक सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन आमदार संभाजी पाटील निलंगेकर व आमदार अभिमन्यू पवार यांनी देखील फेसबुक लाईव्ह च्या माध्यमातून केले आहे .

# सीओ अनमोल सागर यांच्या संकल्पनेतील अनोखा बाळंत विडा गर्भवतींना मिळणार

## ड्रायफ्रूटसह विविध घटकांचा किटमध्ये समावेश

लातूर, /प्रतिनिधी- जिल्ह्यातील कुपोषण आणि माता मृत्युदर कमी करण्यासाठी जिल्ह्यातील गर्भवती महिलांना ड्रायफ्रूटसह विविध घटकांचा समावेश असलेला मबाळंत विडाफ किट देण्याचा निर्णय लातूर जिल्हा परिषदेने घेतला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या संकल्पनेतून राबविल्या जाणाऱ्या या उपक्रमाचा लाभ जिल्ह्यातील २ हजार गर्भवतींना होणार आहे.

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण २०२३-२४ अंतर्गत नाविन्यपूर्ण योजना मधून वन स्टॉप सोल्युशन सेंटर फॉर वूमन अँड चाईल्ड या नाविन्यपूर्ण उपक्रमात जिल्ह्यातील एकूण ८७ अंगणवाडी केंद्रांची निवड



करण्यात आली आहे. या अंतर्गत २ हजार गर्भवती महिलांसाठी मबाळंत विडाफ किट उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. माता मृत्यू दर कमी करणे, गाव कुपोषणमुक्त करणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

एक हजार दिवस बाळाचे या अंतर्गत उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या मबाळंत विडाफ किटमध्ये प्रत्येकी एक किलो खारीक, गूळ, फुटाणा डाळ, शेंगदाणे, प्रत्येकी अर्धा किलो गावरान तूप व खोबरे, प्रत्येकी पाव किलो बदाम, डिंक, काजू, आळीव, जवस, तीळ, ओवा, बडीशेप, तसेच काळे मीठ, २ बेडशीट, २ टॉवेल, आईसाठी २ गाऊन आदी सामग्री दिली जाणार आहे, असे जिल्हा परिषदेचा महीला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख यांनी कळविले आहे..

# देशासह राज्यांतील हवामान पुन्हा बदलणार

नवी दिल्ली/ पुणे : देशातील अनेक राज्यांमध्ये पुन्हा एकदा हवामान बदलणार आहे. महाराष्ट्रातील स्थिती पाहता हवामान चक्राच्या बदलामुळे मागील काही आठवड्यात ऐन हिवाळ्यात पावसाचा अनुभव, तर आता पहाटे थंडी, दुपारी कडाक्याच्या उन्हाचा अनुभव घ्यावा लागत आहे. भारतीय हवामान विभागाने अंदाज वर्तवला आहे की ११ ते १४ मार्चपर्यंत पश्चिम हिमालयीन प्रदेशात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस आणि बर्फवृष्टी होईल.महाराष्ट्रात सध्या काही भागात उन्हाळा सुरू झाला असून वाढत्या उकाड्याने नागरिकांना आतापासूनच हैराण केले आहे. मराठवाडा आणि पूर्व विदर्भात अंशतः ढगाळ हवामान (पान ७ वर)

# नवभारत अचिव्हर्स अवॉर्डने ऋषिकेश कराड सन्मानित

**लातूर / प्रतिनिधी-** नवभारत मीडिया समूहाच्यावतीने युएई राजघराण्यातील वरिष्ठ सल्लागार डॉ. अर्शी आयुब मोहम्मद झवेरी यांच्या हस्ते येथील युवा उद्योजक तथा भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ऋषिकेश रमेश कराड यांना नवभारत अचिव्हर्स अवॉर्डस् अंतर्गत नवभारत व्यवसाय उत्कृष्टता पुरस्कार देऊन दुबई येथे शनिवारी एका शानदार सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.

यावेळी देशभरातील २७ जणांना हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी ऋषिकेश कराड यांना सन्मानित करण्यात आले. अध्यात्मिक, सामाजिक व वैचारिक विचारांचा पगडा असलेल्या कराड कुटुंबात जन्मलेले आणि या कुटुंबाचे संस्कार घेऊन ऋषिकेश कराड यांनी 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेतून शेतीवर आधारित कौशल्या सिल्क रिलिंग उद्योगाची उभारणी केली. तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योग क्षेत्रात भरारी घ्यावी, या संकल्पनेतून भाजपचे



नेते, आमदार रमेश कराड यांनी प्रोत्साहन दिले. कौशल्या सिल्क रिलिंग उद्योगातून सुमारे १५० स्त्री-पुरुषांना रोजगार उपलब्ध करून दिला. मराठवाड्यात पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात रेशीम उद्योगाची उभारणी केल्याने अनेकजण या प्रकल्पाची पाहणी करून पाठीवर कौतुकाची थाप देत आहेत. यासह गीर गाईंच्या दूध डेअरीत ते लक्षणीय कामगिरी दाखवत आहेत. रामेश्वर येथील संत गोपाळबुवा महाराज शुगर अ‍ॅण्ड अ‍ॅग्रो फूड इंडस्ट्रीजचे ते संस्थापक संचालक असून, वायुपुत्र श्री हनुमान व्यायामशाळेचे ते सल्लागार आहेत. येथील श्रीधन्वंतरी वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे संचालक म्हणून काम पाहत गोरगरीब रुग्णांना एमआयटी मेडिकल कॉलेज आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून त्यांनी मदतीचा हात दिला आहे. लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील नमो चषक कला क्रीडा स्पर्धेचे मुख्य संयोजक म्हणूनही त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली. ग्रामीण भागात विविध स्पर्धांचे नियोजन करून ग्रामीण खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

यशवंत धाराशिव जिल्हा

सोमवार दि. ११ मार्च २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## कारसेवक बागल यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

तुळजापूर दि.१० (प्रतिनिधी) – तालुक्यातील नळदुर्ग येथील १९९२ साली अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी आंदोलनात कारसेवेसाठी आपल्या जीवाची पर्वा न करता गेलेले संजय बलभीम बागल (वय- ५३) यांचे दि.९ मार्च रोजी दुपारी हृदयविकाराच्या झटक्याने प्रवास दरम्यान दुःखद निधन झाले. ज्यासाठी आयुष्यभर लढा दिला ते प्रभू श्रीरामचंद्र यांचे अयोध्या येथे मंदिर पूर्ण झाले. त्या रामलल्लाचे दर्शन घेण्यासाठी बागल अयोध्या येथे गेले होते. दर्शन घेऊन अयोध्येहुन परत येताना त्यांना प्रवास दरम्यान त्रास होऊ लागला होता. मध्य प्रदेशातील बीना रेल्वे स्टेशन येथे त्यांना हृदयविकाराच्या झटका आला. त्यांना उपचारासाठी गज बासुंदा येथील रुग्णालयात नेले असता त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, २ मुली व मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर नळदुर्ग येथे रविवार दि.१० मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता अत्यंसंस्कार करण्यात आले. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील



यांच्यासह विविध स्तरातील नागरीक उपस्थित होते.

# गावागावांतील तरुणांना व्यायाम शाळा व साहित्य देण्यासाठी प्रयत्न करणार – खा. राजेनिंबाळकर

### ६५ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे बक्षीस वितरण थाटात

### पहिले महिंद्रा स्कॉर्पिओ तर दुसरे बक्षीस महिंद्रा ट्रॅक्टर







धाराशिव दि.१० (प्रतिनिधी) – हल्लीची तरुण पिढी वेगवेगळ्या व्यसनात अडकून आपले स्वास्थ्य बिघडवीत आहेत. त्यामुळे या तरुणांना निर्व्यसनी राहता यावे व आपले शरीर सुदृढ व निरोगी ठेवता यावे यासाठी गावागावात व्यायाम शाळा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याबरोबरच त्यासाठी आवश्यक असलेले सर्व व्यायामाचे साहित्य देणे देखील तितकेच गरजेचे आहे. तरुण सुदृढ राहिले तर महाराष्ट्रासह देशातील तरुण पिढी बलदंड होईल. त्यामुळे गावागावात तरुणांना व्यायाम शाळा व साहित्य देण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करु, असे आश्वासन खासदार ओमराजे निंबाळकर यांनी दि.१० मार्च रोजी दिले.

धाराशिव शहरातील स्वस्तिक मंगल कार्यालयात महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद व आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१६ – २० नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या ६५ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण कार्यक्रम सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, कुस्ती स्पर्धेचे आयोजक सुधीर पाटील, अर्जुन वीर पुरस्कार विजेते काकासाहेब पवार, महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे सचिव वामनराव गीते, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शप) चे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर, राष्ट्रवादी कॉंग्रेस (अप) चे जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे, भाजपा सहकार आघाडीचे सहसंयोजक दत्ता कुलकर्णी, भाजप राज्य कार्यकरिणी सदस्य बसवराज मंगरुळे, विनोद गपाट, सतीश देशमुख , महाराष्ट्र व गोवा राज्य बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड मिलिंद पाटील, हनमंत मडके, काकासाहेब सांळुखे, मोहन मुंडे, नवनाथ जगताप, युवराज राक्षे, किरण मोरे, सोमनाथ गुरव, डॉ. चंद्रजित जाधव, आदर्श शिक्षण संस्थेच्या सरचिटणीस प्रेमाताई पाटील, प्रशासकीय अधिकारी आदित्य पाटील, अभिराम पाटील आदी उपस्थित होते. पुढे बोलताना खा राजेनिंबाळकर म्हणाले की, अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून व सगळ्या संकटावर मात करून अनेक पैलवान तयार होत आहेत. त्यांना व्यासपीठ मिळावे यासाठी सुधीर पाटील यांनी धाराशिव येथे महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करून तो यशस्वी केला असल्याचे सांगितले. तसेच तरुणांनी व्यसनापासून दूर राहायचे असेल तर व्यायाम व कुस्ती या खेळाकडे वळावे, असे आवाहन त्यांनी केले. तर माजी आमदार सुजितसिंह ठाकूर म्हणाले की, मी आमदार झाल्यानंतर जिल्ह्यात अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन घेऊन जिल्ह्याची मागासलेपणा व दुष्काळी ओळख पुसून टाकण्याचा प्रयत्न केला असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सुधीर पाटील यांनी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा पार पडून धाराशिव चा तुरा महाराष्ट्रात लावण्याचे कौतुकास्पद काम केल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासात या कामगिरीची नोंद घेण्यास भाग पाडल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे आजपर्यंत एवढ्या मोठ्या रकमेची बक्षिसे देण्याचे काम कोणीही केले नसून ते काम सुधीर पाटील यांनी केले. तर या कुस्ती स्पर्धेत सहभागी होऊन पैलवानांनी नावलौकिक केला असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रास्ताविकात सुधीर पाटील यांनी या कुस्ती स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नेते मंडळींना वेळ मिळाली नसल्याची खंत व्यक्त केली. या स्पर्धेमध्ये ९४० पैलवान सहभागी झाले होते. विशेष म्हणजे जिल्ह्यात कुस्ती वाढली पाहिजे. राज्य स्तरावर खेळाडू घडावेत यासाठी लोकप्रतिनिधींनी कुस्तीकडे लक्ष द्यावे अशी मागणी त्यांनी केली. तसेच तरुणांनी इतरत्र भटकण्यापेक्षा शरीरयष्टीकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यासाठी तालीम व साहित्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी करीत ते म्हणाले की, गावागावांमध्ये तालीम संघ नोंदणीकृत झाले पाहिजेत. जर पूर्वी नोंदणी केली असेल व ते नियमित नसतील तर ते करून घ्यावेत. गावागावात पैलवान तयार व्हावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी महेंद्र धुरगुडे, संजय पाटील दुधगावकर, दत्ता कुलकर्णी, काकासाहेब पवार, मिलिंद पाटील आदींसह इतरांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य घार्गे यांनी तर उपस्थितांचे आभार अभिराज पाटील यांनी मानले. यावेळी कुस्ती प्रेमी, विद्यार्थी, संस्थेतील सर्व शाखेचे प्राचार्य, पर्यवेक्षक व नागरिक आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**या स्पर्धेत राज्यभरातील ९५० कुस्तीगीरांनी भाग नोंदवला होता. तर ५०० पंचांनी या स्पर्धेचे काम पाहिले होते. माती आणि गादी या दोन गटात प्रत्येकी १० अशा एकूण २० प्रमुख लढतीतून महाराष्ट्राचा ६५ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत नांदेड येथील शिवराज राक्षे त्याने नाशिक येथील हर्षवर्धन सदगीरला पराभूत केले. यावेळी विजेता शिवराज राक्षे याला महिंद्रा स्कॉर्पिओ तर उपविजेता नाशिकचा हर्षवर्धन सदगीर यांना महिंद्रा ट्रॅक्टरचे व २० गटांतील विजेत्यांना पारितोषिक म्हणून बुलेट व शाईन गाड्यांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.**

## एस.टी. कामगारांकडून आ. चौगुले यांचा सत्कार

उमरगा दि.१० (प्रतिनिधी) – एस.टी. महामंडळामध्ये कर्तव्य बजावत असताना विविध कारणास्तव बडतर्फ झालेल्या राज्यभरातील कर्मचाऱ्यांनी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्याकडे पुन्हा सेवेत रूजू करण्याची मागणी केलेली होती. बडतर्फ झालेल्या अनेक एस.टी. कामगारांचे कुटूंब रस्त्यावर आलेले होते. याबाबत उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार ज्ञानराज चौगुले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करून विविध कारणास्तव बडतर्फ झालेल्या महाराष्ट्र राज्यातील सुमारे ३४० एस.टी. कामगारांना पुन्हा नोकरी करण्याची संधी मिळवुन दिली आहे. हे सर्व कामगार आज कामगिरीवर आहेत.

या राज्यभरातील सर्व एस.टी. कामगारांच्या वतीने रविवार दि.१० रोजी उमरगा येथे आमदार ज्ञानराज चौगुले यांचा ऋणानुबंध सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात एस.टी. कामगारांच्या वतीने एस.टी. बसची प्रतिकृती भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना आ चौगुले म्हणाले की, काम करत असताना कर्मचाऱ्यांच्या हातुन काही लहानशा चुका नकळत घडल्यास त्यांना आपण बडतर्फ करण्यासारखी मोठी शिक्षा दिल्यास त्यांचे संपूर्ण कुटुंबच उघड्यावर येते. अत्यंत कमी पगारावर एस.टी. कर्मचारी हे काम करत असतात. त्यामुळे त्यांना पुन्हा सेवेत घेण्यासाठी आपण प्रयत्न केले व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे आपल्या प्रयत्नांना यशही मिळाले आहे. परंतू काही कर्मचारी जाणुनबुजुन अपहार, प्रवाशांशी गैरव्यवहार करत असतील तर त्यांच्यावर कारवाई ही झालीच पाहीजे.



जे कर्मचारी इमानइतबारे आपले कर्तव्य निभावतात अशा कर्मचाऱ्यांच्या आपण कायम पाठीशी असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

यावेळी किरण गायकवाड तर अध्यक्षस्थानी शिवसेना तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, लोहारा तालुकाप्रमुख जगन्नाथ पाटील, मुरूमचे माजी नगरसेवक शेखर मुदकण्णा आदी उपस्थित होते. कार्यक्रमास राष्ट्रीय कर्मचारी सेनेचे राज्य उपाध्यक्ष प्रकाश निंबाळकर, गुणवंत दरेकर, रेवती मुंडे, कृष्णाबाई सगर, रूपसेन जाधव, विभागीय उपाध्यक्ष (निलंगा आगार), सुनिता मुंडे बीड, माधव पवार, निलंगा रा.कर्मचारी सेना अध्यक्ष, सचिन शिंदे रोहा, सुभाष तेलघाणे अहमदपुर, दत्ता मर्कड छ.संभाजीनगर, सचिन पाथरकर छ.संभाजीनगर, रविंद्र शितोळे पुणे, बापुराव लोखंडे पुणे, रूपाली सुतार कोल्हापुर, राजश्री थोरवत कोल्हापुर, राजेश माने निलंगा, गुलाब पवार मुख्याध्यापक, नागनाथ जाधव माजी सनदी अधिकारी यांच्यासह राज्यभरातील पुन्हा सेवेत रूजू झालेले एस.टी. कर्मचारी उपस्थित होते.

## पालकमंत्री सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त न्यू होम मिनिस्टरचे आयोजन



धाराशिव दि.१० (प्रतिनिधी) – राज्याचे आरोग्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या संकल्पनेतून होम मिनिस्टर, खेळ रंगला पैठणीचा हा लोकप्रिय कार्यक्रम होणार आहे. धाराशिव शहरातील लेडीज क्लबच्या प्रांगणात दि.११ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता हा कार्यक्रम रंगणार असून पैठणीसह भरगच्च आकर्षक बक्षिसांची मेजवाणी लाभणार आहे. सुप्रसिद्ध सिने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर, अभिनेत्री सोनाली पाटील आणि बाल गायिका टीव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर यांची उपस्थिती राहणार आहे. रोजच्या धकाधकीच्या जीवनातून गृहिणींना, माता–भगिनींना काही आनंदाचे क्षण मिळावे, यासाठी या कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमात काही मजेदार बुद्धिवर्धक व आकर्षक खेळ, प्रश्नमंजुषा, उखाणे आदी भरगच्च कार्यक्रम असणार आहेत. या कार्यक्रमाचे शिवसेना नेते तथा जिल्हा परिषदचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या हस्ते उद्घाटन होणार असल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी दिली आहे. राज्याचे आरोग्यमंत्री तथा धाराशिवचे पालकमंत्री डॉ. प्रा. तानाजीराव सावंत यांचा वाढदिवस १५ मार्च रोजी आहे. महिला कुटुंबाचा कणा आहे. आपला संसार संभाळताना त्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्यामध्ये असणाऱ्या कलागुणांना वाव देता यावा यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आमचे मार्गदर्शक नामदार तानाजीराव सावंत हे नेहमीच महिलांचा आदर करतात आणि महिलांच्या महिलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी ते नेहमीच तत्पर असतात. त्यामुळे महिलांना रोजच्या कामातून वेळ मिळावा आणि या थोडा आनंदा घेता यावा यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. धाराशिव शहरातील लेडीज क्लबच्या प्रांगणात सायंकाळी ५ वाजता होम मिनीस्टर खेळ पैठणीचा हा कार्यक्रम रंगणार आहे. स्पर्धेतील विजेत्या महिलांना भरगच्च पारितोषिके देण्यात येणार आहेत. कार्यक्रमात लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले असून स्पर्धेतील विजेत्यास मानाच्या तब्बल ३०१ पैठणी साड्या देण्यात येणार आहेत. शिवाय प्रत्येक सहभागी महिलेस आकर्षक अशी भेट वस्तू देण्यात येणार आहे. कार्यक्रमात विजेत्यांना प्रथम क्रमांकास स्कुटी, दुसऱ्या क्रमांकास डबलडोअर फ्रीज, तिसऱ्या क्रमांकास स्मार्ट टिव्ही, चौथ्या क्रमांकाच्या विजेत्यास वाशिंग मशिन तर लकी ड्रॉमधील विजेत्यांना पैठणीसह ३१ मिक्सर देण्यात येणार आहेत. महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा. कार्यक्रमात सहभाग नोंदविण्यासाठी ९७६५२२११११, ८१०१२५२५२५, ९८८१५३२५९५, ८२०८०१९९७९, ९०२२४९८६३४ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन साळुंके यांनी केले आहे.

## अन्यथा छोट्या पक्षांना सोबत घेऊन लोकसभा निवडणूक लढणार – प्रा. धोंडे

धाराशिव दि.१० (प्रतिनिधी) – राज्यामध्ये लिंगायत समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात असून आजपर्यंतच्या प्रस्थापित राजकीय मंडळींनी या समाजाचा फक्त वापर करून फेकून देण्याचे काम केलेले आहे. लिंगायत समाजाची ४० विधानसभा मतदार संघात आमदार होण्या इतकी संख्या आहे. त्यामुळे या समाजाला राजकीय सत्तेत सहभागी करून घेण्यात यावे यासाठी सेवा जनशक्ती पार्टीची स्थापना केली आहे. आजपर्यंत राज्यांमध्ये ३ हजार शाखा काढून वीरशैव लिंगायत आंदोलन करून जीआर काढून ३ जातींना एसबीसी तर २१ जातींना ओबीसी प्रवर्गाचि लाभ झाला आहे. येत्या निवडणुकीमध्ये महायुती किंवा महाविकास आघाडीने या समाजाचा सन्मान करून त्यांना जागा द्याव्यात. अन्यथा छोटे – छोटे पक्ष घेऊन आम्ही लोकसभेच्या जागा लढविणार असल्याची घोषणा सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख प्रा मनोहर धोंडे यांनी दि.१० मार्च रोजी केली.

धाराशिव येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मराठवाडा सरचिटणीस सुनील शेरखाने, जिल्हाध्यक्ष ॲड रामेश्वर शेटे, संजय गिराम, सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष समाधान भोरे, उपाध्यक्ष नितीन लगदिवे, सोलापूर जिल्हाध्यक्ष राजकुमार सारडे, भूम तालुकाध्यक्ष प्रवीण शेटे, राजाभाऊ माळी, सत्यवान हिंगमिरे, विनोद वाडकर, रमेश ममशेट्टी आदी उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा धोंडे म्हणाले की, वीरशैव लिंगायत समाजाचे काम करीत असताना महाराष्ट्रातील ३ हजार शाखा स्थापन केलेल्या आहेत. तर कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेश व उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये देखील मोठ्या प्रमाणात काम उभा केले असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच लिंगायत वाणी, गुरव, पांचाळ, सुतार यासह २४ जातींना आरक्षण मिळवून दिले असल्याचे त्यांनी सांगितले. महात्मा बसवेश्वर यांनी लिंगायत धर्म स्थापन केला नाही. तर महात्मा बसवेश्वर हे ब्राह्मण जातीचे असल्याचा काही मंडळींनी कांगावा केला मात्र ते ब्राह्मण समाजाचे नसल्याचा खुलासा देखील त्यांनी केला. महाराष्ट्र शासनाने सामाजिक न्याय विभागाच्यावतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता पुरस्कार दिला जातो. त्याच धर्तीवर महात्मा बसवेश्वर सामाजिक समता पुरस्कार देण्याची मागणी त्यांनी केली. तसेच कपिलधारा येथे धार्मिक




स्थळ विकास आराखड्यासाठी निधी मंजूर केला आहे. तर अहमदपूर येथील शिवलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या लिंग स्थापनेच्या कार्यक्रमास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जाती उपजाती पलीकडे जाऊन बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सेवा जनशक्ती पार्टीची स्थापना करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे या लोकसभा निवडणुकीमध्ये लिंगायत समाजाला महायुतीने तसेच महाविकास आघाडीने सन्मान जनक जागा द्याव्यात. जर योग्य राजकीय वाटा नाही दिला तर महादेव जानकर, ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, सदाभाऊ खोत, विनय कोरे यासारख्या छोट्या छोट्या पक्षांना घेऊन शक्य असेल तिथे उमेदवार उभा करून आम्ही निवडणूक लढणार असल्याचा इशारा त्यांनी दिला. तसेच सध्या प्रस्थापिता कडून लोकशाहीला घातक व मारक असे काम केले जात असल्याचे सांगत ते म्हणाले की दहशत व भीती सर्वसामान्यांवर मोठ्या प्रमाणात निर्माण करण्यात येत असल्याचे देखील त्यांनी नमूद केले.

### अबकी बार चार सौं कशाच्या जीवावर ?

सर्वत्र मोदी सरकारच्या विरोधात मोठ्या प्रमाणात असंतोष आहे. प्रधानमंत्री मोदी अबकी बार चार सौ पारचा नारा देत आहेत. तो कशाच्या जीवावर देत आहेत ? असा सवाल करीत ते म्हणाले की राजकीय समुद्र पूर्णपणे गढूळ झालेला असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे ३०१८ ला देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय मंत्री रामदास आठवले, विनय कोरे, सदाभाऊ खोत, महादेव जानकर व मला आश्वासन देऊन फसवले असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.



# शिक्षण महर्षी कर्मयोगी डॉ. नारायणराव चाटे यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

चापोली / प्रतिनिधी- शिक्षण महर्षी कर्मयोगी डॉ. नारायणराव चाटे यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त सोमवारी दि. ११ प्रसिद्ध किर्तनकार श्री महंत महादेव महाराज बोराडे शास्त्रीजी यांचे कीर्तन प्रयाग निवासस्थान समोर होणार आहे. तसेच रक्तदान शिबिराचेही आयोजन यावेळी करण्यात आलेले आहे.

शिक्षण महर्षी कर्मयोगी डॉ. नारायणराव चाटे यांनी १९६४ साली नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा चापोली येथे संजीवनी विद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली. चापोली व जाणवळ जिल्हा परिषद गटातून सलग दोन वेळेस जिल्हा परिषद सदस्य तसेच बांधकाम व आरोग्य सभापती म्हणून काम केले आहे. १९६४ पासून केलेल्या शैक्षणिक, सामाजिक कार्याची दखल घेऊन दक्षिण अमेरिकेतील विद्यापीठाने चाटे गुरुजींना डी. लिट् ही पदवी प्रदान केली. त्याबरोबरच महाराष्ट्र शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. ममहात्म ज्योतिराव फुले शिक्षक परिषदेच्या वतीने राज्यस्तरीय समाजरत्न नागरी पुरस्कार देऊन गौरविले आहे. नांदेड येथील वनिता विकास बहुउद्देशीय महिला मंडळयांच्या वतीने त्यांना मराठवाडा भूषण पुरुस्कार देवून सन्मानित केले आहे. तसेच महात्मा कबीर समता परिषदेच्या वतीने लातूर भूषण व जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. शिक्षण महर्षी कर्मयोगी डॉ. नारायणराव चाटे यांनी शेवटच्या श्र्वासापर्यंत शैक्षणिक, सामजिक व धार्मिक कार्य करतच राहिले. त्यांनी उभे केलेल्या संजीवनी शैक्षणिक संकुलामुळेच १९६४ पासून आजपर्यंत चापोली व परिसरातील शेतकरी व शेतमजुरांचे पाल्यांसाठी शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली व यातूनच चापोली व परिसरातील गावाचा खरा विकास झाला.

शिक्षण महर्षी कर्मयोगी डॉ. नारायणराव चाटे यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. धनंजय नारायणराव चाटे, चापोलीचे लोकनियुक्त सरपंच तथा संस्था सचिव डॉ. भालचंद्र नारायणराव चाटे, गोविंद किशनराव चाटे, प्रा. डॉ. फुलचंद किशनराव चाटे, लालचंद किशनराव चाटे, प्रा. जयचंद ज्ञानोबा भताने, प्रा. डॉ. रविंद्र ज्ञानोबा भताने यांनी केले आहे.

# हरिश्चंद्र बिराजदार सारख्या खेळाडूंमुळे लातूरचे नाव देशपातळीवर पोहोचविले : ना. संजय बनसोडे

उदगीर : उदगीर व तालुक्यातील ग्रामीण कुस्ती या खेळाचे अनन्यसाधारण असे महत्व आहे. या खेळाला देशपातळीवर व राज्य पातळीवर रुस्तम ए हिंद स्व. पै. हरिश्र्चंद्र बिराजदार, काकासाहेब पवार यासारख्या कुस्तीपटूंनी लातूर जिल्ह्याचे नाव राज्य व देश पातळीवर नेऊन पोहोचविले असल्याचे गौरवोद्गार राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी काढले.



उदगीर येथील तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर स्व. खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे शनिवारपासून आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवसात पार पडलेल्या स्पर्धेतील विजेत्यांना राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै.संदीप भोंडवे, उपाध्यक्ष पै.विलास कथुरे, कुस्ती मल्लसम्राट पै.अस्लम काझी, तहसीलदार राम बोरगावकर, बालाजी भोसले, वसंत पाटील, सय्यद जानीमियाँ, अभिजीत औटे, दिपाली औटे, वर्षा मुस्कावाड, शाम डावळे, क्रीडा उपसंचालक संजय सबनीस, युवराज नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे आदीसह पैहलवान आणि मान्यवर मंडळी उपस्थित होते

यावेळी बोलताना ना. बनसोडे म्हणाले की, राज्यपातळीवर कुस्तीपटूंचा थरार उदगीर व परिसरातील नागरिकांना अनुभवता यावी याकरिता राज्य शासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या स्पर्धाचे आयोजन केले आहे. अतिशय सुंदर नियोजन आयोजन समितीच्या पदाधिकारी यांनी केले असून उदगीरकरांनी ही या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला त्याबद्दल सर्वांचे ना. बनसोडे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शोभा कुलकर्णी पुणे यांनी केले.

या स्पर्धेत ५७ किलो वजन गटात रणजित पाटील कोल्हापूर (प्रथम), आकाश गड्डे लातूर (द्वितीय), ओम वाघ अहमदनगर व निनाद बडरे सांगली (तृतीय), ७० किलो वजन गटात निखिल कदम पुणे (प्रथम), निलेश हिरुगडे कोल्हापूर(द्वितीय), अनुप पाटील कोल्हापूर व ओंकार फडतरे सातारा (तृतीय), ९७ किलो वजन गटात साकेत यादव पुणे (प्रथम), शशिकांत बोगारडे कोल्हापूर (द्वितीय), लक्ष्मण पाटील सोलापूर व अजय थोरात सातारा (तृतीय), ५५ किलो वजन गटात वैभव पाटील कोल्हापूर (प्रथम), संकेत पाटील कोल्हापूर (द्वितीय), ओंकार रोडगे व स्वप्नील भिंगारे सोलापूर (तृतीय). ७७ किलो वजन गटात नितीन कांबळे कोल्हापूर (प्रथम), सुशांत पालवे सोलापूर (द्वितीय), विष्णू तातपुरे लातूर व विश्र्वजित पाटील कोल्हापूर (तृतीय), १३० किलो वजन गटात दिग्विजय भोंडवे पुणे (प्रथम), प्रतीक देशमुख पुणे (द्वितीय), अक्षय शेळके लातूर व भूषण पवार सांगली (तृतीय). महिलांच्या ५० किलो वजन गटात ज्ञानेश्र्वरी पायगुडे पुणे (प्रथम), आर्या पाटील कोल्हापूर (द्वितीय) व प्रमिला पवार कोल्हापूर (तृतीय), ५९ वजन गटात कल्याणी गादेकर पुणे (प्रथम), आकांक्षा नलावडे पुणे (द्वितीय), सृष्टी भोसले कोल्हापूर (तृतीय) व महिला ७६ किलो वजन गटात प्रतिक्षा बागडी सांगली (प्रथम), वेदीका ससाणे कोल्हापूर (द्वितीय) व सिद्धी शिंदे पुणे (तृतीय). यांचा समावेश आहे. सर्व विजेत्यांना क्रिडामंत्री ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आले. आज सोमवारी कुस्ती स्पर्धेचा शेवटचा दिवस असणार आहे.

# मध निर्यातीत भारत जगात नवव्यास्थानी

ऑकलंड : जगातील अनेक देश मोठ्या प्रमाणात मधाचे उत्पादन करतात. पण जगात सर्वाधिक मध उत्पादन करणारा देश न्यूझीलंड आहे. छोटासा असणारा न्यूझीलंड हा देश मध उत्पादन आणि निर्यातीत आघाडीवर आहे. हा देश सुमारे २७५ कोटी रुपयांचा मध निर्यात करतो. भारतातही मधाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असून भारत नवव्यास्थानी आहे. मध उत्पादनात अनेक देश आघाडीवर आहेत.

भारतात मधाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. पण मध निर्यातीच्या बाबतीत भारत जगात ९ व्या क्रमांकावर आहे. देशातील उत्तर प्रदेश, गुजरात, पंजाब, बिहार आणि मध्य प्रदेश या पाच राज्यांमध्ये मधाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. जगात सर्वाधिक मध निर्यात न्यूझीलंड करतो. या छोट्या देशाने २०२२ मध्ये ३३३.३४ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच सुमारे २७५ कोटी रुपयांचा मध निर्यात केला. जगातील नैसर्गिक मध निर्यातीत न्यूझीलंडचा वाटा सुमारे १२ टक्के आहे. मनुका मध निर्यात करणारा न्यूझीलंड हा जगातील एकमेव देश आहे. मधमाशा हा मध विशेष प्रकारच्या फुलापासून बनवतात. यामध्ये अनेक प्रकारचे औषधी गुणधर्म आढळतात. या कारणास्तव, जगभरातील अनेक देशांमध्ये याला मोठी मागणी आहे. ते खूप महाग विकले जाते. भारतात, त्याच्या ३५० ग्रॅम पॅकची किंमत सुमारे ४,००० रुपये आहे. न्यूझीलंडच्या एकूण मध निर्यातीच्या कमाईमध्ये मनुका मधाचा वाटा ८२ टक्के आहे.


आघाडीवर असणारे देश कोणते? मध निर्यातीच्या बाबतीत न्यूझीलंडनंतर चीनचा दुसरा क्रमांक लागतो. चीन दरवर्षी सुमारे २२९.६ दशलक्ष डॉलर्सचा मध निर्यात करतो. चीनमध्ये दरवर्षी ५००,००० टन मधाचे उत्पादन होते. जगातील एकूण मध उत्पादनापैकी एक चतुर्थांश मधाचे उत्पादन चीनमध्ये होते. या यादीत अर्जेटिना तिस-या क्रमांकावर आहे. या देशाने २०२० मध्ये १७९.५ दशलक्ष डॉलर किमतीचा मध निर्यात केला. या देशातून दरवर्षी सुमारे ७५००० टन मधाची निर्यात होते. अर्जेटिनातील मध हा उच्च दर्जाचा मानला जातो. युरोपीय देश जर्मनी आणि युक्रेन हेही मध निर्यात करणा-या पहिल्या पाच देशांमध्ये आहेत. यानंतर स्पेन, ब्राझील आणि हंगेरीचा क्रमांक लागतो. मध निर्यातीत भारतात ९ वा क्रमांक लागतो. त्यानंतर व्हिएतनामचा क्रमांक लागतो.

भारतात किती उत्पादन?

या यादीत भारत नवव्या क्रमांकावर आहे. भारताने २०२० मध्ये ८७.५६ दशलक्ष डॉलर किमतीचा मध निर्यात केला. राष्ट्रीय मधमाशी मंडळाच्या मते, २०२१-२२ या आर्थिक वर्षात भारताने १५५००० टन मधाचे उत्पादन केले. भारतात उत्तर प्रदेश, गुजरात, पंजाब, बिहार आणि मध्य प्रदेशमध्ये सर्वाधिक मधाचे उत्पादन होते. उत्तर प्रदेशात लखीमपूर खेरी, बहराइच, सिद्धार्थ नगर आणि बस्तीमध्ये मधाचे सर्वाधिक उत्पादन होते. गुजरातमधील खेडा, आनंद आणि वडोदरा, पंजाबमधील लुधियाना, जालंधर आणि अमृतसर, बिहारमधील वैशाली, मुझफ्फरपूर आणि समस्तीपूर आणि मध्य प्रदेशातील उज्जैन, इंदूर आणि देवास येथे मधाचे उत्पादन केले जाते.

# श्री अंबिका योगाश्रमाचे ७ एप्रिल पासून मोफत योग शिबीर

नवी मुंबई(प्रतिनिधी) - : श्री अंबिका योगाश्रम ऐरोली शाखेच्या वतीने ऐरोली येथे सुरू असलेल्या मोफत योग प्रशिक्षण शिबिराचे नवीन बेंच ७ एप्रिल२०२४ पासून सुरू होणार आहे. यासाठी, आपले नाव नोंदणी करावी, असे आवाहन योगाचार्य श्री नित्यानंद प्रभू यांनी केले आहे. शिबिरात महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था असणार आहे. परमपूज्य हटयोगी निकम गुरुजी यांनी सुरू केलेल्या श्री अंबिका योगाश्रम ठाणे यांच्या वतीने ऐरोली येथील ज्ञानदीप शाळा सेकटर-२ ऐरोली येथे योगाचार्य श्री नित्यानंद प्रभू यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिमासिक मोफत योग शिबीरच्या माध्यमातून योगचे प्रशिक्षण दिले जाते.



येत्या ७ एप्रिल२०२४ पासून नवीन बॅचला सुरुवात होत आहे. निरोगी आयुष्यासाठी योगसाधनेचे महत्व लक्षात घेता जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिरात सहभागी होऊन निरोगी आयुष्य जगावे, असे आवाहन श्री नित्यानंद प्रभू यांनी केले आहे. मोफत योग शिबीरासाठी आपले नाव नोंदणी श्री नित्यानंद प्रभू - ९८३३९३०९७९ क्रमांकावर संपर्क साधावा तसेच शिबिराच्या स्थळी देखिल नाव नोंदणी केली जाईल, असे प्रभू यांनी सांगितले आहे.




# संपादकीय

## मुदतवाढ कशासाठी ?

निवडणूक रोख्यांच्या गुंतवणूकदारांचे तपशील निवडणूक निकालापूर्वी उघड न करण्याच्या स्टेट बँकेच्या प्रयत्नामागे भाजपचे प्रचारात नुकसान होऊ नये हा विचार आहे का? जनतेस ते कळले पाहिजे.

निवडणूक रोख्यांच्या संदर्भातील माहिती निवडणूक आयोगाला देण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाने मुदतवाढ मागितली आहे. ही माहिती ३० जूनपर्यंत सादर करू असे बँकेने ५ मार्च रोजी सर्वोच्च न्यायालयास सांगितले. ही माहिती ६ मार्चपर्यंत सादर करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. बँकेच्या या भूमिकेने न्यायालयाचा अवमान झाल्याचा आरोप करत एका स्वयंसेवी संस्थेने सर्वोच्च न्यायालयातच अर्ज दाखल केला आहे. तो तर्कसंगत वाटतो. आश्चर्याची बाब म्हणजे स्टेट बँकेच्या मुदतवाढीच्या विनंतीवर निवडणूक आयोगाने काहीही मत व्यक्त केलेले नाही. गेल्या १५ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोख्यांची योजना घटनाबाह्य ठरवली. स्टेट बँकेने दिलेली माहिती १३ मार्चपर्यंत निवडणूक आयोगाने आपल्या संकेत स्थळावर(वेब साइट) प्रसिद्ध करावी असा आदेशही सर्वोच्च न्यायालयाने त्याच निकालात दिला होता. जर बँकेने माहिती वेळेत दिली नाही, तर निवडणूक आयोगही येत्या दि.१३ पर्यंत ती प्रसिद्ध करू शकणार नाही हेही स्पष्ट आहे. याचा अर्थ बँक व आयोग दोघेही सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करत आहेत असा होतो. निवडणूक रोखे' निवडणुकीशी संबंधित आहेत. मग मागितलेल्या मुदतवाढीचा' संबंधही निवडणुकीशी आणि त्याच्या वेळापत्रकाशी आहे का?

### कोणाला वाचवण्यासाठी ?

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मुदतीत माहिती सादर न करण्यासाठी बँकेने दिलेले कारण चमत्कारिक आणि न पटणारे आहे. निवडणूक रोख्यांशी संबंधित बरीच माहिती कागद पत्रांच्या' (फिजिकल) स्वरूपात आहे. ती पाकिटांमध्ये सीलबंद आहे, त्यामुळे ती न्यायालयाने आखलेल्या मुदतीत देता येत नाही अशा आशयाचे कारण स्टेट बँकेने दिले आहे. ही देशातील सर्वात मोठी बँक आहे. आजचे युग डिजिटल' आहे. बँकांच्या सर्व व्यवहारांची माहिती संगणकांवर नोंदलेली असते. ती क्षणार्धात एका क्लिक'ने उघड(ओपन) करता येते. त्याची मुद्रित प्रत तयार करण्यासही वेळ लागत नाही. असे असताना स्टेट बँक तब्बल चार महिन्यांची मुदतवाढ का मागत आहे? हाच मुद्दा बँक कर्मचारी महासंघ या कामगार संघटनेने उपस्थित केला आहे. सरकारी बँका व त्यांचे कर्मचारी यांचा सत्तारूढ घटक त्यांच्या संकुचित राजकीय हितसंबंधांसाठी करत असल्याचे अलीकडे आढळून आले आहे असेही या कामगार संघटनेने म्हटले आहे. त्यासाठी फाळणी दिवस' पाळणे व विकसित भारत संकल्प यात्रा' यांचे उदाहरण संघटनेने दिले आहे. हा मुद्दा थोडा वेगळा असला तरी त्यातील मथितार्थ लक्षात घेतला पाहिजे. स्टेट बँक सरकारी बँक आहे. निवडणूक रोख्यांची विक्री करण्याचे अधिकार केवळ याच बँकेला होते. २०१९ पासून ही विक्री सुरु झाली. त्याचे तपशील कागदपत्रां'च्या रूपात फायली व सीलबंद लखोट्यांत असेल हे मानणे अवघड आहे. मग सत्तारूढ घटक' बँकेवर ती माहिती उघड न करण्यासाठी दबाव आणत आहे का? अशी शंका येते. रोख्यांच्या विक्रीतून कोणत्या पक्षाला किती पैसे मिळाले हे तर आधीच जाहीर झाले आहे. सर्वात जास्त रक्कम भारतीय जनता पक्षाला मिळाली. प्रश्न आहे कोणी' किती पैसे कोणाला दिले याचा. या रोख्यांमधून राजकीय पक्ष व देणगीदार' यांच्यात देवघेवीचे'(क्विड प्रो को) संबंध निर्माण होतात याकडे सर्वोच्च न्यायालयाने निकालात लक्ष वेधले होते. १३ मार्च व ३० जून या तारखा महत्त्वाच्या आहेत. जर १३ मार्च रोजी देणगीदारांची नावे जाहीर झाली तर भाजपला कोणी पैसे दिले व त्यांचा गेल्या पाच वर्षांत किती फायदा झाला हे जगासमोर येईल. प्रचारात त्याने भाजपचा तोटा होईल. निकाल मे महिन्यात जाहीर होणे अपेक्षित आहे. जर भाजपला परत सत्ता मिळाली तर ३० जून रोजी देणगीदारांची नावे जाहीर होण्याने सत्तेत' असलेल्या भाजपचे नुकसान होणार नाही. बहुमताच्या बळावर पुन्हा विरोधकांची टवाळी करणे सोपे होईल; पण तसे झाले नाही तर..? कळीचा प्रश्न हाच आहे. त्यामुळे तपशील उघड करणे लांबवणे भाजपसाठी महत्त्वाचे आहे. स्टेट बँक त्यासाठी मुदतवाढ मागत आहे का?

### सुविचार

भित्री माणसे मरण्यापूर्वी अनेकदा मरतात पण शूर मात्र एकदाच मरतो.-- शेक्सपिअर

### संस्कृत सुभाषित

विद्या नसे ज्या तप दान नाही । न ज्या गुण ज्ञान न शील काही ।। न धर्म भूमिप्रति भारकारी । पशूच ते मानव देहधारी ।। **अर्थ:** त्याग, श्रीगुरुंची कृपा, सत्यवाणी, शौर्य, अंत:करणाची निश्चलता व निरोगीपणा अशा गुणांची येथे प्रशंसा केली आहे.

**ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.**

– संपादक **यशवंत** लातूर

## केपलर ४२



जर्मनीतील बील या गावी थोर शास्त्रज्ञ केपलर याचा जन्म इ.स. १५५१ मध्ये झाला. घरची अत्यंत गरिबी त्यामुळे छोटी मोठी कामे करतच त्याला आपले शिक्षण पूर्ण करावे लागले. केपलर लहानपणी बराच अशक्त होता. देवीच्या विकासामुळे त्याच्या डोळ्यांना अधूपण आले होते. तरीपण विश्वविद्यालयातील पदवी परीक्षा पास होऊन त्याची ग्रेटस् मधील महाविद्यालयात खगोलशास्त्राचा प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. जरी खगोलशास्त्राचा त्याचा विशेष अभ्यास नव्हता तरी आर्थिक परिस्थितीमुळे त्याने हे काम पत्करले व मन:पूर्वक खगोलशास्त्राचा अभ्यास सुरू केला. गणित विषय त्याच्या आवडीचा असल्यामुळे खगोलशास्त्रातील अवघड सिद्धांतही त्याला सोपे वाटू लागले.

केपलरने इ. स. १५७६ मध्ये आपला 'गूढ व विस्मयकारक विश्वरचना' हा महत्त्वाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यात निरनिराळ्या ज्ञात ग्रहांच्या स्थितीबाबत माहिती दिली आहे. चारशे वर्षांपूर्वीच्या त्या काळात अवघ्या चोवीस वर्षांच्या केपलरने इतका महत्त्वूपर्ण ग्रंथ प्रसिद्ध केल्यामुळे त्याची कीर्ती जगभर पसरली. इतर शास्त्रज्ञांप्रमाणेच 'टायको ब्राहे' हा शास्त्रज्ञ केपलरच्या ग्रंथामुळे इतका प्रभावित झाला की त्याने मोठ्या आग्रहाने केपलरला प्राग येथे बोलावून प्रागच्या राजदरबारात मोठ्या सन्मानाने गौरविले. 'टायको ब्राहे' याने केपलरला आपले सर्व संशोधनकार्य दाखविले.

सदैव आर्थिक विवंचनेत असलेल्या केपलरला ब्राहेमुळे द्रव्यसहाय्य मिळू लागले. टायको ब्राहेमुळेच केपलरचे अनेक दुर्गुण जाऊन प्रचंड कल्पनाशक्ती असलेला हा शास्त्रज्ञ प्रगतिपथापर्यंत पोहोचला. इ.स. १६०९ मध्ये केपलरने ग्रहांच्या गतीविषयी आपले दोन नियम मांडले. १) ग्रहांच्या कक्षा दीर्घवर्तुळाकार आहेत. २) सूर्य व ग्रह यांना जोडणारी एक काल्पनिक रेषा काढली, तर ती समान काळात समान क्षेत्रफळ आक्रमिते. या संशोधनामुळे त्याला खूप प्रसिद्धी मिळाली. यानंतर ग्रहांचे सूर्यापासूनचे अंतर व त्यांना सूर्यप्रदक्षिणेस लागणारा काळ यांच्यामधील परस्परसंबंध सिद्ध करण्यासाठी केपलरने खूप मेहनत घेऊन नऊ वर्षांच्या अथक परिश्रमानंतर १६१९ मध्ये केपलरने गतीविषयक आपला तिसरा नियम जगापुढे आणला. तो असा की, सूर्यापासून ग्रहांच्या अंतराचा वर्ग व त्याच्या प्रदक्षिणाकालाचा घन हे नेहमी प्रमाणात असतात.

टायको ब्राहेने आपल्या मृत्यूपूर्वी आपली खगोलशास्त्रविषयक सर्व कागदपत्रे केपलरच्या स्वाधीन केली होती. शिवाय या कागदपत्रांचे संपादन व प्रकाशनाची सर्व जबाबदारी त्याने केपलरवर टाकली होती. ब्राहेच्या उपकारांची जाणीव केपलरला होतीच. अत्यंत कठीण परिस्थितीत निधीसंकलन करून केपलरने टायको ब्राहेचे ताऱ्यांविषयीचे संशोधनाचे प्रकाशन पूर्णत्वास नेले. आर्थिक विवंचना, वृद्धापकाळ व प्रकृतीअस्वास्थ्य यामुळे या थोर खगोलशास्त्रज्ञाने इ. स. १६३० मध्ये शेवटचा श्वास घेतला.

## महिला स्वावलंबनाच्या वाटेवर

ऊर्मिला राजोपाध्ये

सध्याचा काळ वेगाने बदलणारा आहे. सामाजिक स्थित्यंतराच्या या काळात मुलांप्रमाणे मुलींनाही नानाविध संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळेच त्यांच्या पाठीशी उभे राहून, त्यांना संपूर्ण सहकार्य करत स्वावलंबी बनवणे गरजेचे आहे. शेवटी महिला दिन हे केवळ एका दिवसाचे साजरीकरण नाही, तर महिलांची सक्षमता, सजगता, स्वाभिमान, स्वत:ची जाणीव निर्माण करणे हे अव्याहत सुरू राहावे अशी प्रक्रिया आहे, त्यात सातत्य राखावे.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने अलीकडे प्रकाशात आलेल्या दोन-चार बातम्यांची प्रकर्षाने नोंद घ्यावी लागेल. नुकतेच विद्येचे माहेरघर' अशी ओळख असणाऱ्या पुणे शहरात अमली पदार्थांचा प्रचंड साठा आढळून आला. जागतिक बाजारपेठेत त्याची किंमत काही कोटींमध्ये असल्याचे सांगितले गेले. त्यानंतरच्या काही दिवसांमध्येच दोन विद्यार्थीदशेतल्या युवती अमली पदार्थ्यांच्या नशेत एका टेकडीवर आढळल्याचे वृत्त आले. त्या तरुणींवर या मादक घटकांचा अंमल एवढा अधिक होता की, आपण कुठे आहोत वा आजूबाजूला काय सुरू आहे, याचे भानही त्यांना नव्हते.

महिलांमधील वाढती व्यसनाधीनता, गुन्हेगारी प्रकरणांमधील वाढता सहभाग यासंबंधीच्या बातम्याही चर्चेत येत असतात. त्यामुळेच महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर एकीकडे त्यांच्यावरील अन्यायावर चर्चा होत असताना, तसेच त्यांच्या हक्कांसंबंधी आवाज उठवताना अशा चुका टाळण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. केवळ एकांगी विचार न करता वस्तुस्थिती लक्षात घेऊन उहापोह केला तरच संभाव्य धोके टाळून महिलांना सुरक्षित आणि सन्मानपूर्वक जगणे शक्य होईल आणि असे झाले तरच खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा होण्याचे समाधान लाभेल.

सध्याच्या युवा पिढीचे, तिला मिळणाऱ्या अतिरिक्त स्वातंत्र्याचे, तिच्या सभोवतालच्या संस्कृतीचे यासारखे अन्य पुरावेही देता येतील. सध्या अशी अनेक कथानके, चित्रपट वा नाटके रसिकमान्यता मिळवताना दिसत आहेत. याचाच अर्थ असा की, आजही वयात येणारी मुलगी मध्यमवर्गीय कुटुंबातील पालकांसाठी एक काळजीचा विषय असतो. एकविसाव्या शतकातही स्त्री-पुरुष समानतेच्या कल्पना वास्तवात आलेली दिसत नाही. त्यामुळेच शाळांमधील लैंगिक अत्याचाराची प्रकरणे वारंवार कानी येतात. म्हणूनच आता मुलींप्रमाणे मुलांना वाढवतानाही तत्त्वे आणि वास्तव यातील तफावत समोर मांडणे गरजेचे आहे.

**चिंताग्रस्त पालक-** मुलीने स्वतंत्र विचार करायला शिकावे, तिच्या जबाबदाऱ्या तिने स्वत: पार पाडाव्यात अशी पालकांची अपेक्षा असतानाच तिला दिलेल्या स्वातंत्र्याचा गैरफायदा तर ती घेणार नाही ना? अशी भयभीत करणारी शंकाही त्यांच्या मनात असते. त्याचप्रमाणे वयात येणाऱ्या मुलीचा गैरफायदा समाजातील दुष्ट प्रवृत्ती घेऊ शकतात याचीही भीती पालकांच्या मनात कायम असते. थोडक्यात मुलीला वाढवणे हे मोठ्या जबाबदारीचे आ-झे असते. लग्न होऊन मुलगी सासरी जाईपर्यंत पालकांच्या जीवाला चैन नसते. या भावनिक ओढीत अनेकदा पालकांच्या चिंता अधिकच वाढतात. त्याच वेळी वयात येणारी मुलगी स्वतंत्र बाण्याची असेल तर तिने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे घरात विसंवादी वातावरण निर्माण होते. आई आणि मुलीचे खटके उडू लागतात. आमच्या वेळी अशी थेरं नव्हती' असे टोमणे बहुतेक आया आपल्या मुलींना मारू लागतात. यातून अपेक्षित परिणाम साधण्याऐवजी आई आणि मुलगी यांच्यातील दरी वाढू लागते. त्यामुळेच मुलीला समजावून घेताना तिची मैत्रीण बनून अधिक जवळ जाण्याची गरज असते. या वयात मुलीला केवळ उपदेशांचे डोस नको असतात, तर कोणीतरी समजून घेणारे, पाठीवर मायेचा हात फिरवून जबाबदारीचे भान देणारे हवे असते. ही जबाबदारी वडिलांपेक्षा आईच अधिक चांगल्या रीतीने पार पाडू शकते.

**मैत्रीपूर्ण नात्याची गरज-** मुलगी स्वत:हून काही सांगत नाही म्हणजे तिला कोणतीच समस्या नाही असा समज पालकांमध्ये निर्माण होण्याची शक्यता असते. दोन्ही बाजूंकडील या गैरसमजामुळे संवादाची प्रक्रिया थांबते. आपल्या भावविश्वात रमणाऱ्या तरुण मुलींना आईने केलेली विचारपूस नकोशी वाटते. आपण आणि आपले भावविश्व यामध्येच रमण्याची वृत्ती वाढीस लागते. त्यामुळे अनेक वर्षे आईशी असणाऱ्या मैत्रीपूर्ण नात्यामध्ये बाधा निर्माण होते. यातून भविष्यात अनेक समस्या निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे मुलींनीही भावविश्वाबरोबर आईशी असलेले मैत्रीपूर्ण नाते जपण्याची गरज असते. अलीकडे अनेक स्त्रिया नोकरी आणि व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर असतात. मुलांच्या आर्थिक गरजा भागवल्या आणि वेळच्या वेळी जेवायला दिले म्हणजे आपली जबाबदारी संपली असा काहींचा गैरसमज असतो. यामुळे मुलांबरोबर गप्पा मारण्यासाठी खास वेळ काढणे अनेकांना जमत नाही. परंतु त्याचा परिणाम घरातील मुलींवर मोठ्या प्रमाणात होतो. आई आणि मुलीच्या नात्यामध्ये संवादाला अधिक महत्त्व असते. अर्थात हा संवाद दोन्ही बाजूने निर्माण होण्यासाठी लहानपणापासूनच मुलीची योग्य जडणघडण आवश्यक असते. आई गृहिणी असेल तर घरात राहणाऱ्या आपल्या आईला बाहेरचे काहीच कळत नाही अशी भावना मुलींमध्ये विशेषत: कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलींमध्ये निर्माण होते. स्त्री नोकरी करणारी असेल तर आईला आपल्यासाठी वेळच नाही अशी भावनाही मुलींमध्ये निर्माण होऊ शकते. मुलीच्या मनातील या दोन्ही समजुती काढून टाकण्याचे काम आईनेच करायला हवे. यासाठी मुलीशी मोकळा संवाद साधायला हवा. कॉलेजमधील वातावरण, मित्रमैत्रिणी वा आवडणारी एखादी बाब अशा अनेक विषयांवर तिच्याशी मनमोकळेपणाने गप्पा मारायला हव्यात. आपल्या मुलीचे प्रत्येक मत चुकीचे आहे किंवा तिच्या वागण्या-बोलण्यातील बदल चुकीचे आहेत असा समज प्रथमत: मनातून काढायला हवा. आधुनिक काळात वावरणाऱ्या आपल्या मुलीला नवीन गोष्टींचे आकर्षण वाटणे स्वाभाविक आहे. या आकर्षणांबद्दल नाक न मुरडता मोकळेपणाने चर्चा करायला हवी. उपभोगाच्या संस्कृतीतील झगमगाट किती क्षणिक असतो हे तिला समजावून सांगायला हवे.

**मुलगी वाढवताना...**

मुलीला वाढवताना तिच्या भावविश्वात शिरुन संवाद साधणे हिताचे ठरते. अलीकडे किमान शहरांमध्ये तरी मुलगा आणि मुलगी असा फरक फारसा होत नाही. त्यामुळे केवळ लग्नाची चिंता न करता मुलीच्या करिअरलाही महत्त्व द्यायला हवे. अमुक एका क्षेत्राविषयी आपल्याला काही कळत नाही म्हणून मुलीलाही त्यापासून दूर ठेवणे चुकीचे आहे. स्पर्धेच्या काळातील नवीन संधींचा शोध घेऊन आवडत्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी मुलीला प्रोत्साहन द्यायला हवे. आजच्या आधुनिक काळातील करिअरचे महत्त्व लक्षात घेऊन मुलीच्या विकासाला संधी प्राप्त करून द्याव्यात. अर्थातच आपली एखादी इच्छा अपूर्ण राहिली म्हणून मुलीने अमूक एका क्षेत्रात करिअर करावे हा अट्टहास अयोग्यच म्हणावा लागेल. पूर्वीपेक्षा सध्या मुलींसाठी अनेक क्षेत्रे खुली झाली असून पालकांनी त्यांचा व्यापक विचार करायला हवा. मुलीच्या मानसिकतेचा आणि भावविश्वाचा विचार करून संधींची जाणीव तिला करून द्यायला हवी. मुलगी अधिक संवेदनशील असली तरी तिला काही क्षेत्र नाकारुन चालणार नाही. नोकरीच्या संधींबरोबरच मुलींना स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन द्यायला हवे. मुलीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी पालकांनी जागरुक रहायला हवे. अर्थात मुलींनीही पालकांच्या अनुभवाचा आणि भूमिकेचा सकारात्मक दृष्टीने विचार केल्यास दोघांच्याही फायद्याचे ठरेल. पालक नेहमीच आपल्या मनाविरुद्ध वागतात किंवा आई मला समजून घेतच नाही असा कांगावा करण्यापेक्षा मुलींनीच समजुतीचे एक पाऊल टाकल्यास संवादामध्ये मोकळेपणा येऊन पालकांना मुलगी' म्हणून आपली काळजी वाटणार नाही, तसेच संवादातील मोकळेपणामुळे पालकही मुलींवर अतिरिक्त बंधने लादणार नाहीत.एकूणच या प्रक्रियेत मुलगी आणि आईच्या नातेसंबंधाची भूमिका महत्त्वाची मानावी लागेल. आर्थिक निर्भरता ही आजची गरज आहे; मात्र सध्या हीच बाब प्रापंचिक आयुष्यातील तणावाचा मुद्दाही ठरत आहे. लग्नाच्या बाजाराकडे पाहता मुला-मुलींचे काही ठाम विचार त्यांना अनेक वर्षे विवाहविना ठेवतात. महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर या वाढत्या गुंत्याकडेही लक्ष वेधायला हवे. सध्या मुले आणि मुली विदेशांमध्ये शिकतात. तिथेच नोकरी करुन स्थायिक होण्याचा काहींचा विचार असतो; मात्र लग्नानंतर आपले सध्याचे शहर कोणी सोडायचे, कारकिर्दीत कोणी एक पाऊल मागे घ्यायचे, प्रपंचातील जबाबदाऱ्यांची सांगड कशी घालायची, व्यग्र आणि व्यस्त दिनक्रमात मुलांना जन्म द्यायचा की नाही, दोघे दूर राहत असल्यास नात्यातील तजेला कसा टिकवायचा हे प्रश्नही अत्यंत कळीचे ठरत आहेच. बरेचदा यात महिलांकडूनच त्यागाची अपेक्षा ठेवली जाते. मात्र आता तरी पुरुषांनी, मुलांनी सम्यक भूमिका घेत तिच्या कारकिर्दीला प्राधान्य देण्याची भूमिका बजावणे गरजेचे आहे. परस्पर सामंजस्य राखणे, स्त्री अधिक कमावत असल्याच पुरुषाने होम मेकरची भूमिका स्वीकारणे, सोशल मीडियाला या काळातही परस्परांमधील संवाद आणि विश्वासार्हता टिकवणे यासारखी पथ्ये पाळली तर समाजातील, तसेच कुटुंबातील विसंवाद कमी होईल आणि महिलेला तिचा हक्क प्राप्त होतील आणि खरे सांगायचे तर तोच खरा महिला दिन असेल.


### गुरु वचन

**आध्यात्मिक आणि भौतिक धन एकत्र मिळत नाही**

संसारात दोन प्रकारचे धन असते. भौतिक धन आणि दुसरे आध्याात्मिक धन. मनुष्याचा स्वभाव आहे की, तो जास्तीत जास्त धन कमवू इच्छितो. एखादी व्यक्ती सोने, चांदी, रूपयांचा ढिग लावल्याने धनवान म्हटला जातो. तर कोणी उपाशी, तहानलेला राहूनही धनवान म्हटला जातो. वास्तवात धनवान दोघेही आहेत. एक भौतिक धनाचा धनी आहे तर दुसरा अध्याात्मिक धनाचा धनी आहे. शास्त्र आणि पुराण सांगातात की, दोन्ही धनात अध्यात्म रूपी धन जास्त श्रेष्ठ आहे. कारण हे धन कोणी चोरून घेऊ शकत नाही. ज्याच्याकडे अध्यात्म रूपी धन असते तो निश्चिंत असतो. त्याला कोणत्याही प्रकारची चिंता आणि भीती नसते. संसारात कोणतीही व्यक्ती अशी नाही जी एकत्र या दोन्ही संपत्तीचे सुख प्राप्त करू शकेल.

अध्यात्म आणि भौतिक धन दोन्ही दोन नावासमान आहेत. दोन्ही नावांतून एकाचवेळी प्रवास करता येत नाही, हे आपल्याला चांगल्याप्रकारे ठाऊक आहे. असे करण्याचा प्रयत्न केला तर बुडणे निश्चित असते. आपल्याला अध्याात्मिक धन अर्जित करून ईश्वराचे ऋण फेडायचे आणि जीवन-मरणाच्या चक्रातून मुक्ती मिळवायची की भौतिक धन अर्जित करून सांसारिक सुखाचा आनंद घ्यायचा आणि वारंवार जीवन-मरणाच्या चक्रात अडकून पापफळ प्राप्त करायचे, हे आपल्या हाती आहे.भागवत् म्हणते ईश्वर ज्याच्यावर प्रेम करतो त्याचे सर्वकाही हिरावून घेतो. सर्वकाही हिरावून घेण्याचा अर्थ आहे सांसारिक सुख हिरावून घेणे. कबीर दास, तुलसीदास, रहीम, मीराबाई, सूरदास, करमैतीबाई याची उदाहरणे आहेत. येशू ख्रिस्तानेही म्हटले की, एकवेळ सूईच्या छिद्रातून ऊंट जाईल. मात्र श्रीमंत माणूस स्वर्ग प्राप्त करू शकत नाही. स्वर्ग न मिळण्याचा अर्थ आहे, ईश्वराची कृपा प्राप्त नसणे. त्याचे कारण जेव्हा खूप धन येते व्यक्ती धन सांभाळणे आणि त्याच्या सुरक्षेबाबत सदैव चिंतित असतो. ईश्वरासाठी त्याच्याकडे वेळ नसतो. आणि भक्ती भावनाही नसते. धनाच्या अहंकारात व्यक्ती ईश्वरीय सत्तेलाही आव्हान देऊ लागतो. तीर्थस्थळांस पर्यटन स्थळ मानून त्याचा अपमान करतो. त्यामुळे अध्याात्मिक धन आणि सांसारिक धन एकत्र मिळू शकत नाही, असे म्हटले जाते.

## साप्ता.राशी भविष्य



दि. ११ मार्च २०२४

........................

मेष : आपल्यासाठी एकच महत्त्वाचा आजचा सल्ला म्हणजे हाताखालील लोकांकडून आज बरीच कामे करून घ्यायचे आहेत. ते दुखावले जाणार नाहीत याची काळजी घ्या. आर्थिकदृष्ट्या उधारी वसुली चांगली होईल. व्यापाऱ्यांना ग्राहकांचा प्रतिसाद पुरेसा मिळेल. एखादा धाडसी व्यवहार करून पैशाची तरतूद साधू शकाल. धार्मिक कृत्यातून चांगले समाधान मिळेल.

वृषभ : घरगुती बाबतीत आपणास आनंददायी घटना कळेल. घरातील वृद्धांच्या तब्येतीकडे लक्ष द्या. मुलांचे बाहेर जाऊन भलतेच उद्योग होत नाहीत ना याची काळजी घ्या. चुकून पडलेला पाय इजा घेऊन येऊ शकतो. कोणताही निर्णय आत्मघातकी ठरू शकतो. थोडे शांतपणे व बरेचसे विचारपूर्वकच पाऊल टाकायचे आहे.

मिथुन : एखादी रहस्यमय बातमी हाती येईल. स्नेहसंबंध दृढ होतील. सहज जाता-जाता एखादा आर्थिक व्यवहार संपन्न होईल. आपल्या कार्यात चांगलेच निमग्न राहता येईल. स्त्रियांना आपली हौस भागवून घेता येईल. कामाचे गणित चुकवून नका. जुने विकार बळावल्यास पुरेसे लक्ष द्या. धर्मकार्य करताना कोणतेही वेगळे बोलणे मुळातून टाळा.कर्क : वडिलोपार्जित इस्टेटीचे वाद असतील तर आज तरी वाढवू नका. नोकरी-व्यवसायातले निर्णय आज झटपट घ्यावे लागतील. कोणत्याही मोठ्या खरेदीचा मोह आवरणे हिताचे. त्यातही आपण घरातील कोणाला ङ्गसरप्राईजफ देण्याच्या उद्देशातून करत असाल तर थोडे थांबा. आर्थिकदृष्ट्या वसुलीसाठी अन्य कोणाची मदत घ्यावी लागेल. भांडवली गुंतवणूक वाढविता येईल. नव्या औद्योगिक क्षेत्राची बातमी कळेल. कला क्षेत्रात एखादी संधी मिळेल. वाहनांवर मात्र ताबा ठेवा. चेक बुक इ. महत्त्वाच्या वस्तू सांभाळून ठेवा. सिंह : कामाच्या ठिकाणी खर्चाचा एखादा मोठा आकडा समोर येणे शक्य. वैवाहिक जीवनात एखादी आनंद वार्ता आपणास कळू शकते. जोडीदाराचा पुरविलेला हट्ट तसेच कुटुंबात कोणाकडून मिळालेली आनंदवार्ता यातून मन उल्हासित बनेल. कोणत्याही परिस्थितीत आपले हितसंबंध दुरावले जाणार नाहीत याची तेवढी काळजी घ्या. कोणालाही एकदम दुखवू नका. कोर्ट-कचेरीची कामे शक्यतो पुढे ढकला.

कन्या : आज आपल्या बोलण्यावर आपण बरेच काही कमवू शकाल. नोकरदार असो की व्यावसायिक आपणास आज चांगली संधी मिळेल. व्यापारात एक महत्त्वाचा टप्पा गाठता येईल. नोकरदारांना वरिष्ठांशी चांगले सूर जमवता येतील. खर्च होणारा प्रत्येक रुपया हा महत्त्वाचा आहे. विचारपूर्वकच त्याला वाट करून द्या. कोणाच्या बोलण्यावर भुलून किंवा गोड बोलण्यात अडकून खर्च वाढणार नाही असे पहा. विशेषत: खरेदी करताना ही गोष्ट लक्षात ठेवा.

तूळ : आजची एखादी कृतीसुद्धा आपणास मनसोक्त यश देणारी ठरू शकते. थोरामोठ्यांबरोबर होत असलेली उठबससुद्धा आपणास फायद्याची ठरेल. घरात आनंदी वातावरण राहील. आर्थिक व्यवहारात कुठेही मागे पडू नका. कामाचा व्याप कितीही वाढला तरी नाराज होऊ नका.

वृश्चिक : सरकारी अधिकाऱ्यांची मर्जी राहील. प्रकाशक मंडळींना चांगला लेखक हाताशी येईल. शिक्षण क्षेत्रात नाव मोठे करता येइल. किराणा दुकानदार तसेच शेतकरी इ. मंडळींना आपल्या ज्ञानाचा फायदा करून घेता येईल. आजचा दिवस आपल्यासाठी एखादी संस्मरणीय घटना आणून देणारा ठरू शकतो. एखादा व्यावसायिक निर्णय आपल्या बाजूने लागेल. भेटी गाठी आणि चर्चासत्रे यांना आज विशेष महत्व द्या.धनू : ऐनवेळी कोणाची झालेली मदत, अनपेक्षितपणे वाढलेली आवक किंवा मोठ्या कार्यातील दूर झालेले अडथळे यातून आनंददायी वार्ता समोर येईल. देवावरचा विश्वास वाढावा असा एखादा प्रसंग आज घडणे शक्य. कामाचा ताण वाढता राहील. मित्र-मैत्रिणींसमवेत दिवसातला काही वेळ आनंदात घालवाल. कुणाचे उणे-दुणे काढण्यापेक्षा आपली व्यावहारिक बाजू सशक्त करण्यावर आज विशेष भर द्या. आपल्याकडे असलेल्या माहितीचा योग्य उपयोग करून घेणार आहात.

मकर : पत्रव्यवहारातून कळणारी एखादी गोड वार्ता, मुलांच्या बाबतीत सुटलेला एखादा प्रश्न नोकरी-व्यवसायात मिळणारी एखादी महत्त्वाची संधी आणि एखादाच महत्त्वाचा ग्राहक हाती आल्याने होणारा आनंद यापैकी एखादा आनंद आज आपणास ग्रहमान देण्यास सिद्ध आहेत. वादविवाद होतीलही परंतु यशाचा ङ्गग्राफफ वाढता राहील. कुठेही स्वत:चा हेका चालू न ठेवता समोरच्याचे शांतपणे ऐका. स्वत:ची बाजूही व्यावहारिकदृष्ट्या विचारात घ्या आणि मगच निर्णय घ्यायला लागा.

कुंभ : राजकारणात असलेल्या मंडळींना वेळीच सावधानतेचा इशारा मिळेल. सामाजिक कार्यातूनही अशीच एखादी धोक्याची घंटी ऐकू येणे शक्य. प्रतिस्पर्ध्यांचे नेमकं डाव लक्षात येतील. नोकरी-व्यवसायात त्याचा अचूक वापर करून घेता येईल. आज प्रवास, पत्रव्यवहार किंवा महत्त्वाच्या अशी गाठभेट यापैकी एखादी गोष्ट फलद्रूप झाल्याचे लक्षात येईल.

मीन : कोणालाही फुकट सल्ला द्यायला जाऊ नका. आपले काम, आपला आर्थिक व्यवहार आणि आपले सगे सोयरे असा खरेतर काहीसा स्वार्थी विचार आज आपणापाशी असणे आवश्यक ठरावे. धर्मकार्याचा बाऊ न करता व्यावहारिकदृष्ट्या आज आपणास अनेक निर्णय घ्यायचे आहेत हे विसरू नका. कामाच्या ठिकाणी काम, घरातल्या ठिकाणी घरचे काम आणि देवधर्माच्या वेळेस फक्त देवधर्म असे वागणेच महत्त्वाचे आहे.

१० मार्चला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर जास्तीत जास्त प्रभाव सुर्याचा व नेपच्यूनचा आहे. तुमची बौध्दिक क्षमता अत्यंत उच्च दर्जाची आहे. कुठल्याही समस्येचे आकलन तुम्हास तात्काळ होऊ शकते व त्यावर उपाय शोधण्याची कार्यवाही तुम्ही लगेच सुरू करता. कुणाच्या हाताखाली काम करणे तुम्हास पसंत नसते. नेतृत्वाचे गुण तुमच्या अंगी जन्मजातच असतात. न थकता काम करण्याची क्षमता अंगी असल्याने असे नेतृत्व तुम्ही सहजगत्या प्राप्त करून घेऊ शकता. तुमचा कारभार स्वच्छ असतो. भ्रष्टाचाराची तुम्हाला विलक्षण चीड असते. समाजात नीतिमुल्ये प्रतिष्ठीत होण्यासाठी तुम्ही सतत प्रयत्नशील रहाता.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)

संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




## रणबीर कपूरच्या रामायण पार्ट १ मध्ये दाखवली जाणार फक्त एवढी कथा!

मुंबई-रणबीर कपूरसाठी गेले वर्ष खूप छान गेले. याचे कारण आहे- ॲनिमल. हा चित्रपट १ डिसेंबर रोजी रिलीज झाला होता. त्याने बॉक्स ऑफिसवर ९१५ कोटींचा व्यवसाय केला होता. आता तो ओटीटीवरही स्ट्रीम होत आहे. बरं, आता रणबीर कपूर कोणत्या चित्रपटामुळे चर्चेत आहे, याबद्दल बोलूया. हा चित्रपट नितेश तिवारीचा 'रामायण' आहे. यामध्ये रणबीर कपूर रामची भूमिका साकारताना दिसणार आहे. या चित्रपटासाठी तो बोलण्याचे प्रशिक्षणही घेत असल्याचे नुकतेच समोर आले होते. यासाठी त्याच्या अनेक लूक टेस्टही करण्यात आल्या आहेत. तथापि, हा फक्त पहिला भाग असेल. पुढील कथा त्याच्या सिक्वेलमध्ये दाखवण्यात येणार आहे. आता 'रामायण पार्ट १' मध्ये किती कथा पाहायला मिळणार याची माहीती मिळाली आहे.



रणबीर कपूरचा 'रामायण' तीन भागात प्रदर्शित होणार आहे. निर्मात्यांनी प्रत्येक भागासाठी कथा वेगवेगळ्या भागात विभागली आहे. पहिल्या भागात प्रभू राम, त्यांचे अयोध्येतील कुटुंब, त्यांचा सीतेसोबतचा विवाह आणि १४ वर्षांचा वनवास दाखविण्यात येणार आहे. आता पुढच्या दोन भागात किती स्टोरी दाखवली जाईल ते जाणून घ्या.

सध्या रणबीर कपूरच्या 'रामायण'चा पहिला भाग रिलीज होणार आहे. चित्रपटातील कोणत्या पात्रात कोण दिसणार हे रामनवमीच्या मुहूर्तावर जाहीर होणार आहे. आतापर्यंत फक्त रणबीर कपूर आणि सई पल्लवीचीच नावे फायनल झाली आहेत. अलीकडे सनी देओल 'हनुमान'ची भूमिका साकारणार असल्याचे बोलले जात होते. मात्र, आता तिन्ही भागांची कथाही कळली आहे. नुकताच बॉलिवूड हंगामाचा एक रिपोर्ट समोर आला आहे. यानुसार, पहिल्या भागात भगवान राम, त्यांचे अयोध्येतील कुटुंब, सीतेसोबतचे त्यांचे लग्न आणि १४ वर्षांचा वनवास अशी कथा दाखवण्यात येणार आहे. पहिल्या भागाची कथा सीतेच्या अपहरणाने संपेल असे म्हटले जाते. निर्मात्यांना या कथेची घाई करायची नाही. यामुळे, ते मोठ्या काळजीने सर्वकाही तयार करत आहेत. 'रामायण'च्या दुसऱ्या भागात राम, लक्ष्मण आणि हनुमान यांची खास भेट दाखवण्यात येणार आहे. वानरसेनेची रामाची भेट आणि राम सेतूच्या बांधकामाची कथा दुसऱ्या भागात असेल.


तिसरा आणि शेवटचा भाग रावणाच्या युद्धाची कथा असेल. जेव्हा प्रभू राम सीताजींना रावणापासून वाचवून अयोध्येत आणले.नुकतेच असे सांगण्यात आले की 'रामायण' सध्या प्री-प्रॉडक्शनच्या टप्प्यात आहे. मात्र अनेक स्टार्स या चित्रपटात सामील होत असल्याच्या चर्चा रंगत आहेत. ज्याची घोषणा १७ एप्रिल रोजी रामनवमीच्या मुहूर्तावर केली जाईल.

## दाक्षिणात्य सुपरस्टार रुग्णालयात दाखल

### मेंदूच्या शस्त्रक्रियेविषयी जवळच्या माणसानं सांगितलं...

दाक्षिणात्य सुपरस्टार रुग्णालयात दाखल असून त्याशिवाय त्याच्यावर ब्रेन सर्जरी होण्यावर त्याच्या जवळच्या व्यक्तीनं वक्तव्य केलं आहे.

चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार अभिनेता अजित कुमारला चेन्नईच्या अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ही बातमी समोर येताच त्याच्या चाहत्यांना त्याची चिंता वाटू लगाली आहे. सोशल मीडियावर ही बातमी खूप व्हायरल होत आहे. तर असा दावा देखील करण्यात आला आहे की त्याची ब्रेन सर्जरी करण्यात आली आहे. आता अजित कुमारच्या मॅनेजरनं त्याची हेल्थ अपडेट दिली आहे. त्यानं सांगितलं की तो रुटिन चेकअपसाठी रुग्णालयात गेला होता. त्यासोबत त्यानं अजितच्या ब्रेन ट्यूमर आणि ब्रेन सर्जरीच्या बातमीची ही अफवा असल्याचे म्हटले. अजित कुमारचा मॅनेजर सुरेश चंद्रानं सांगितलं की 'ब्रेन ट्यूमरच्या ऑपरेशनची बातमी खरी नाही आहे. तो नियमित जशी तपासणी करतो म्हणजेच त्याचं हे रेग्युलर हेल्थ चेकअप होतं. ही तपासणी करत असताना डॉक्टरांच्या लक्षात आलं की त्याच्या कानाच्या खाली असलेल्या नसा या थोड्या कमकूवत आहेत. अर्ध्या तासाच्या आत त्यांच्यावर संपूर्ण उपचार करण्यात आले. त्याच्याशिवाय त्याच्या मॅनेजरनं पुढे सांगितलं, आता अजित कुमारला जनरल वॉर्डमध्ये शिफ्ट करण्यात आलं आहे. त्याला आज रात्री किंवा शनिवार सकाळी लवकर डिस्चार्ज देण्यात येईल. त्याच्याविषयी मिळालेली ही अपडेट कळताच अजितच्या लाखो चाहत्यांना थोडा आनंद झाला आहे. आता त्याच्या चाहत्यांना हिच आशा आहे की लवकरच त्याला डिस्चार्ज मिळेल आणि तो सटवर परतेल. दरम्यान, या आधी अभिनेत्याच्या जवळच्या व्यक्तीनं 'जूम टीवी' ला सांगितलं होतं की परदेशातील यात्रेवरजाण्याआधी अजित आपल्या रुटिन चेकअपसाठी रुग्णालयात गेला होता. परदेशात म्हणजे अजितला अजरबैजान येथे जायचे होते. अजित कुमारनं नुकताच त्याच्या मुलीचा ९वा वाढदिवस साजरा केला. ज्याची थीम फुटबॉल होती. त्याचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले होते. अजित विषयी बोलायचे झाले तर तो सध्या मगिज थिरुमेनी दिग्दर्शित 'विदा मुयारची' शूटिंग करत होती. या चित्रपटात त्याच्यासोबत अभिनेत्री तृषा मुख्य भूमिकेत दिसली होती. असं म्हटलं जातं की त्यांची शूटिंग ९० टक्के पूर्ण झाली आहे आणि लवकरच संपेल.



## अवैध उद्योग पर्यावरणाच्या मुळावर

पर्यावरणाला हानी पोहोचवणारे अनेक घटक समाजात सक्रिय असून बेकायदेशीर उद्योगांद्वारे घडणाऱ्या दुर्घटना आणि त्यामुळे होणारी जीवित, वित्त तसेच पर्यावरणाची हानी हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. सध्या वैयक्तिक स्वार्थापोटी नियम, कायदे धाब्यावर बसवून अनेक धंदे चालतात. फटाक्याच्या अवैध कारखान्यांमध्ये चुकीच्या पद्धतीने काम चालते. अशा एखाद्या ठिकाणी लागणारी आगदेखील पर्यावरणाची मोठी हानी घडवून आणू शकते.

सध्या पर्यावरणविषयक अनेक प्रश्न कळीचे बनले आहेत. पर्यावरणाला हानी पोहोचवण्यात काही उद्योगांचा वाटा बराच मोठा असल्याचेही नाकारून चालणार नाही. अलीकडेच राजधानी दिल्लीतील निवासी भागातील एका बेकायदेशीर कारखान्याला आग लागली आणि फटाक्यांची निर्मिती करणाऱ्या युनिटच्या मालकासह ११ जणांचा मृत्यू झाला. हे केवळ वानगीदाखल उदाहरण म्हणावे लागेल. प्रत्यक्षात असे अनेक उद्योग पर्यावरणाबरोबरच मनुष्याच्या जीवितालाही गंभीर धोके पोहोचवताना दिसतात. बेजबाबदारपणे सुरू असणाऱ्या अशा अवैध धंद्यांबाबत प्रशासनाने सतत मौन बाळगले आहे. महापालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पोलीस आदींसह सर्व प्रमुख नियामकांच्या डोळ्यांवर लाचखोरीची पट्टी किती काळ टिकणार, हा मोठा प्रश्न आहे. मोठ्या संख्येने लोकांसाठी प्राणघातक ठरणाऱ्या अशा बेकायदेशीर औद्योगिक किंवा व्यावसायिक उपक्रमांना आळा का घातला जात नाही? सर्वजण जबाबदार असतील, तर कारवाई का होत नाही? अशा धोकादायक बेकायदेशीर उद्योग आणि व्यावसायिक उपक्रमांना प्रभावीपणे रोखण्यासाठी ठोस उपाययोजना का केल्या जात नाहीत, या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत.

राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात अकार्यक्षम आणि भ्रष्ट दिल्ली महानगरपालिका, दिल्ली राज्य औद्योगिक आणि पायाभूत सुविधा विकास महामंडळ, उद्योग विभाग यांच्या छायेखाली बेकायदेशीर उद्योग आणि कारखाने लोकांचे जीवन हिरावून घेत आहेत. दिल्ली हे लहान उद्योगांचे एक मोठे केंद्र आहे. १९९६ मध्ये दिल्ली सरकारने उद्योगांच्या पुनर्वसनासाठी योजना जाहीर केली होती. त्या अंतर्गत औद्योगिक युनिटस दिल्लीच्या निवासी भागातून हलवली जाणार होती. १९९९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकारकडून निवासी भागातील प्रदूषणकारी उद्योग हटवण्यासाठी उचललेल्या पावलांची माहिती मागितली होती. सर्वांना ताबडतोब स्थलांतरित करण्याचे आदेश दिले; परंतु सरकार निष्क्रिय राहिले. २ डिसेंबर २००२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकारकडून सहा आठवड्यांच्या आत कारवाईचा अहवाल मागवला. २००४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने सर्व प्रदूषणकारी आणि धोकादायक युनिट्सना शहरात काम न करण्याचे आदेश दिले होते. याला एक तपाहून अधिक काळ होऊनही आजही हे शहर स्फोटकांवरच बसले आहे. काही बेकायदेशीर कारखान्यांवर तुरळक कारवाई करण्यात आली असली तरी राजकीय दबावापोटी त्यातही हलगर्जीपणा होता. त्यामुळेच विषारी हवेने गुदमरणारी हजारो बेकायदेशीर आणि धोकादायक औद्योगिक आणि व्यावसायिक युनिट्स दिल्लीकरांच्या जीविताशी आजही खेळत आहेत.



दिल्ली सरकारने काही औद्योगिक क्षेत्र विकसित केले. काहींना तेथून हलवण्याच्या अटीवर सरकारकडून औद्योगिक भागात स्वस्तात भूखंड मिळाले. पण अधिकाऱ्यांच्या संगनमताने निवासी भागातच हे कारखाने अद्याप सुरू आहेत. निवासी भागातील इमारतींमध्ये बेकायदेशीर उद्योग, कारखाने, दुकाने आणि विविध व्यावसायिक उपक्रम चालतात. तेथील रस्ते अरुंद आहेत. मालवाहतूक करणारे टेम्पो-ट्रक, रस्त्यावरील फेरीवाले, रिक्षा आदी वाहने रस्त्यावरच उभी केली जातात.इमारतींमध्ये पार्किंगची व्यवस्था वा जागा नाही. त्यामुळे मालक, कर्मचारी, ग्राहक यांची वैयक्तिक वाहने आणि स्थानिक रहिवाशांची वाहने वसाहतीसमोरच्या रस्त्यांवर उभी केली जातात. वाहतूक पोलीसही त्याकडे डोळेझाक करतात.


बांधकाम साहित्य विक्रेत्यांचा मालही रस्त्यावर पसरतो. काही रस्त्यांवर तारांचे जाळे आहे. इमारती एकमेकांना जोडलेल्या असल्यामुळे एका इमारतीत झालेल्या दुर्घटनेचा धोका शेजारच्या इमारतींना जाणवतो. त्या ठिकाणी कारखाना आणि आजूबाजूची घरेही प्रसंगी आगीच्या भक्ष्यस्थानी पडतात. अशा वेळी अग्निशमन दल अरुंद गल्लीबोळातल्या रस्त्यावरून घटनास्थळी कशी पोहोचणार, याचा विचार ना दिल्लीकर नागरिक करतात ना प्रशासन. दर वर्षी शेकडो लोक औद्योगिक अपघातात मरतात आणि अपंग होतात. मात्र या समस्येचे निराकरण होताना दिसत नाही.नोव्हेंबर २०१० मध्ये ललिता पार्क परिसरात झालेल्या दुर्घटनेत ७१ जणांचा मृत्यू झाला होता. महामंडळ आणि दिल्ली सरकार एकमेकांवर आरोप करत होते. येथे पाच मजली बेकायदा इमारत कशी बांधली, अशी विचारणा करून पाच अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली होती. एका दशकानंतर समितीने सेवानिवृत्त अधिकाऱ्याला २१ हजार रुपयांचा दंड ठोठावून प्रकरण बंद केले. अशी अनास्था काय कामाची? बेकायदेशीर बांधकामांमुळे प्रौढांनाच नाही, तर लहान मुले आणि वृद्धांनाही जीव गमवावा लागला आहे. तरीही संपूर्ण दिल्लीत बेकायदेशीर बांधकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. इमारत किती जुनी आहे, बांधणी किती मजबूत आहे, वायरिंग किती जुनी आहे याची तपासणी न करता सरकार तात्पुरत्या संरक्षणासाठी दिल्ली विशेष कायदा सतत वाढवत आहे.जुन्या वायर्स जास्त भार सहन करू शकत नाहीत, मात्र त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. स्थानिक आराखड्यानंतर झोनल प्लॅन व्हायला हवा, नियोजन खालच्या पातळीवरून सुरू व्हायला हवे आणि नंतर अंतिम मास्टर प्लॅनपर्यंत त्याची भर पडायला हवी. मात्र याकडे कोणीही गांभीर्याने बघत नाही. मात्र इथे नियोजनाच्या आणि चोख प्रशासनाच्या कामातही बेजबाबदारीचे प्रदूषण जाणवते. इमारत अग्निरोधक असावी, अग्निशमन सेवेने वारंवार तपासणी करावी ही काळजी घेण्याची सामान्य बाब झाली. मात्र आज खासगी पाण्याच्या टाक्या इमारतींवर असूनही आग लागल्यास त्यात प्रवेश करणे किंवा ते पाणी वापरून आग विझवण्याचा प्रयत्न करणे शक्य नाही. अशा स्थितीत उंच इमारती आणि गजबजलेल्या ठिकाणी भूमिगत पाण्याच्या टाक्या अनिवार्य असणे आवश्यक आहे.

दिल्लीतील अलीपूर भागात घडलेली घटना नक्कीच भयानक आणि दुखद आहे. मात्र अशा घटना अलीपूरमध्येच नाहीत, तर औद्योगिक शहर असणाऱ्या फरीदाबाद, गुरुग्राम, सोनीपतसह एनसीआरच्या इतर जिल्ह्यांमध्येही पाहायला मिळतात. रहिवासी भागात बेकायदेशीरपणे सुरू असणारे असे कारखाने आणि जीवित तसेच वित्तहानी करणाऱ्या ज्वलनशील रासायनिक पदार्थांचा वापर न थांबवण्याचा प्रश्न राजकीय हस्तक्षेप आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या जबाबदारीच्या अभावामुळे अधिक गंभीर ठरतो. असे कारखाने उभारणाऱ्यांना भविष्यातील धोक्यांची जाणीव करून देण्यास जनजागृतीचा अभाव कारणीभूत आहे.माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनीही एकदा आपल्या भाषणात म्हटले होते की, भारतीय जनतेमध्ये सामान्यतः काहीही चालते' असे म्हणण्याची प्रवृत्ती असते. हा ट्रेंड चांगला नाही. प्रत्येक गोष्ट नियमानुसार केली पाहिजे. मात्र याकडे लक्ष दिले जात नाही. अनेक वेळा जागरूक व्यक्ती किंवा बाधित लोक रहिवासी भागात सुरू असणाऱ्या प्रदूषणकारी धोकादायक कारखान्यांविरोधात तक्रारी घेऊन प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे जातात. त्यानंतर अधिकारी संबंधित अधिकाऱ्यांना कारवाई करण्याच्या सूचना देतात आणि पथकही कारवाईसाठी घटनास्थळी पोहोचते. मात्र तेवढ्यात राजकारण्यांचे फोन येतात आणि आता काही करू नका, असे सांगितले जाते. मग कर्मचारी कोणतीही कारवाई न करता किंवा नाममात्र कारवाई करून करत परत जातात. मात्र अशा वेळी वरिष्ठ अधिकाऱ्याने प्रकरण समजून घेऊन कारवाई थांबवणाऱ्या राजकारण्याशी संवाद साधून समजावयाचा प्रयत्न करायला हवा.

आज प्राथमिक स्तरावर ठोस कारवाई झाली नाही, तर भविष्यात काहीतरी भयंकर घडेल, याची कल्पना देऊन परिणामांची जाणीव करू द्यायला हवी. अशा संवादातून राजकारण्यांना परिस्थिती स्पष्ट होईल. अशा प्रकारे सदर समस्येशी दोन हात करण्यासाठी सामूहिक प्रयत्न होणे आवश्यक आहे. राजकारण्यांचा सकारात्मक सहभाग, प्रशासकीय अधिकाऱ्यांची इच्छाशक्ती आणि प्रत्येक पावलावर सहकार्यासह स्थानिक रहिवाशांमध्ये जागरूकता असेल, तर कोणतीही कार्यवाही सहजसाध्य होते. रोग आढळून आला आणि प्राथमिक स्तरावर योग्य औषध दिले, मलमपट्टी केली, तर कर्करोगदेखील पसरत नाही. शासन आणि प्रशासनातील लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांनी हा विचार करण्याची, कृती करण्याची आणि जनहिताचे निर्णय घेण्याची क्षमता विकसित व्हायला हवी. तेव्हाच अशा धोकादायक व्यावसायिक कारवायांविरुद्ध ठोस उपाययोजना उद्याला येतील आणि त्यांची अंमलबजावणीही होऊ शकेल.

-मिलिंद बेंडाळे, पर्यावरण अभ्यासक

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# राष्ट्रीय जंगम संघटनेच्या माध्यमातून जंगम समाजाचा सर्वंकष विकास करण्यासाठी प्रयत्नशील राहणार

लातूर : राष्ट्रीय जंगम संघटनेच्या माध्यमातून केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशाच्या विविध प्रांतातील जंगम समाज बांधवांच्या सर्वंकष विकास करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही राष्ट्रीय जंगम समाज संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय समन्वयक श्रावण राजेंद्र जंगम सातारा यांनी बिडवे ग्रीन हॉल राजीव गांधी चौक लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय जंगम संघटनेच्या लातूर जिल्हा शाखेच्या आयोजित बैठकीत बोलताना दिली.

या बैठकीत श्रावण जंगम यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय जंगम संघटनेच्या लातूर जिल्ह्यातील काही पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या घोषित करण्यात आल्या. अशोक मठपती गुरुजी यांची जेष्ठ मार्गदर्शक म्हणून निवड करण्यात आली. लातूर जिल्हा प्रसिद्धी प्रमुख म्हणून श्रीधर स्वामी, चाकूर तालुका समन्वयक म्हणून बसवराज विश्वनाथ स्वामी घरणीकर, महिला आघाडी लातूर जिल्हा समन्वयक म्हणून सौ संगीताताई नागनाथ स्वामी (चिट्टे) , आध्यात्म आघाडी लातूर जिल्हा समन्वयक म्हणून शिवकांत स्वामी गुरुजी , अमोल स्वामी (दुबलगुंडी) , विजयकुमार स्वामी हुंडेकरी उदगीर यांची निवड दक्षिण कर्नाटक व पच्छीम तेलंगणा संपर्क समन्वयक म्हणून घोषित करण्यात आली. हावगी मानवेंद्र स्वामी यांची लातूर तालुका समन्वयक म्हणून निवड केली. या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार समाज बांधवांच्या वतीने करण्यात आला.

यावेळी संघटनेचे जिल्हा समन्वयक चंद्रशेखर स्वामी हुंडेकरी, जिल्हा कार्याध्यक्ष त्र्यंबक गुरुनाथ स्वामी, सूर्यकांत पत्रे स्वामी, बसवराज स्वामी लिंबाळकर , बसवराज स्वामी चिट्टे,बसवराज स्वामी लिंबाळकर, वधू वर परिचय मेळाव्याचे अध्यक्ष मन्मथ बसवराज स्वामी बाभळगावकर,शिवसेनेचे सामाजिक कार्यकर्ते व जंगम संघटनेचे लातूर जिल्हा कार्याध्यक्ष त्र्यंबक स्वामी, त्र्यंबक प्रभुअप्पा स्वामी,ब्रम्हानंद स्वामी साकोळकर, यांसह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना श्रावण जंगम पुढे म्हणाले की, आपल्या जंगम समाजाचे मजबूत संघटन व्हावे, समाजातील युवकांना नोकरी - रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, समाजाला राजकीय, सामाजिक क्षेत्रात सन्मानाने वागता यावे, समाजाच्या आर्थिक प्रगतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत या आणि इतर अनेक महत्वपूर्ण कारणांसाठी आपण समाजाचे राष्ट्रीय पातळीवर संघटन करण्यासाठी या संघटनेची मुहूर्तमेढ रोवली आहे. आपला समाज संख्येने खूप आहे. पण सगळीकडे विखुरलेला असल्याने समाजाला राजकीय लाभापासून सातत्याने वंचित राहावे लागते. समाज संघटीत झाल्यास आपण आपल्या समाजाची ताकद दाखवून देऊन सर्वंकष प्रगती साधून घेऊ शकतो. सध्या आपण महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात कार्यकारिणी नेमून संघटन मजबूत करण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहोत. गाव पातळीपासून ते जिल्हा पातळीपर्यंत संघटना पोहोचवण्याचे काम वेगाने चालू आहे. या माध्यमातून आपल्या समाजाची जनगणनाही करण्याचा आपला प्रयत्न आहे. राज्यात संघटना मजबूत झाल्यानंतर आपण देशातील अन्य प्रांतातील आपल्या समाज बांधवांना संघटीत करणार आहोत. येत्या काही वर्षात आपली संघटना देशपातळीवरील एक अग्रगण्य संघटना असेल असा विश्वासही श्रावण जंगम यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिवकांत स्वामी यांनी तर आभार प्रदर्शन बसवराज विश्वनाथ स्वामी कोकलगे घरणीकर यांनी मानले. यावेळी बाळासाहेब बाबु स्वामी आरजखेडा, संगमेश्वर शिवमुर्ती स्वामी,चंद्रशेखर स्वामी हुंडेकरी,पंढरपुरे महादेव,नागनाथ चिट्टे,सौ. सुनिता शशिकांत राजूरकर,सौ.किर्ती संगमेश्वर स्वामी,राजूरकर शशिकांत स्वामी,आदी मान्यवर उपस्थित होते.

# साहित्य अकादमीच्या विविधांगी योजनांचा लाभ घ्यावा :डॉ.पाठक

लातूर : साहित्य अकादमी ही भारतातील भाषांमधील साहित्याच्या संवर्धनासाठी वाहिलेली संस्था असून या संस्थेकडून लेखन,संशोधन,अनुवाद,विविध साहित्यप्रकारातील कलाकृती यासाठी पुरस्कार व अनुदान दिले जाते.साहित्य अकादमीतर्फे विविध वाड्मयीन उपक्रम, कार्यशाळा, परिसंवाद, सेमिनार यांचे सातत्याने आयोजन केले जाते. साहित्य अकादमी ही दरवर्षी २४ प्रमुख भारतीय भाषांपैकी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नवोदित तरूण लेखकांना युवा पुरस्कारही देते. प्रकाशन, पुरस्कार आणि प्रोत्स-ाहन देणे हे साहित्य अकादमीचे कार्य आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून पार्श्वभूमी लाभलेली साहित्य अकादमी ही जास्तीत-जास्त लोकाभिमुख झाली पाहिजे आणि साहित्य अकादमीमार्फत उच्च दर्जाचे सृजनशील साहित्य राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचले पाहिजे. साहित्य अकादमीची चळवळ अधिकाधिक वृद्धिंगत झाली पाहिजे.भाषांतर,अनुवादाच्या माध्यमातून भारतीय साहित्य वैश्विक पातळीवर झळकले पाहिजे,यासाठी ती अविरतपणे कार्यरत आहे. अशा या साहित्य अकादमीच्या



भारतीय साहित्य,समकालीन साहित्य व संस्कृत प्रतिभा या जर्नल्समधील दर्जेदार लेखनाचे वा इतर साहित्याचे वाचन करून वाचनसंस्कृतीची जोपासणा केली पाहिजे.मराठी लेखकांनी आपापले दर्जेदार व सकस साहित्य इंग्रजी,हिंदी भाषेमध्ये भाषांतर करून घेतले पाहिजेत.साहित्य अकादमी ही दिल्ली,मुंबई,कलकत्ता,चेन्नई व बेंगलोर अशा विविध ठिकाणातील कार्यालयाच्या माध्यमातून ग्रंथ प्रकाशन,काव्य संमेलन,नारी चेतना,आविष्कार, कथाकथन,ट्रॅव्हल ग्रँट,दिव्यांगाना संधी आणि विविध शिष्यवृत्ती दिल्या जातात.अशा या भारत सरकारच्या,शासनाच्या साहित्य अकादमीच्या विविधांगी योजनांचा लाभ घ्यावा,असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील साहित्य अकादमीचे सदस्य डॉ.नरेंद्र पाठक यांनी केले.

येथील दयानंद कला महाविद्यालयातील मराठी भाषा व वाड्मय विभाग आणि संशोधन केंद्राच्या वतीने दि.०९ मार्च २०२४ रोजी शिक्षक,प्राध्यापक, संशोधक,अभ्यासक व लेखक, कवींसाठी साहित्य अकादमीच्या विविध योजना आणि वाड्मयीन उपक्रम उद्बोधन कार्यशाळे चे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बीजभाषक व उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड होते. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड असे म्हणाले की,दयानंद शिक्षण संस्था ही नामांकित शिक्षण संस्था असून संस्था व महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थी,प्राध्यापक यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम व कार्यशाळेचे आयोजन केले जाते. साहित्य,संगीत,कला,क्रीडा अशा सर्वच क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारी,आर्थिक पाठबळ देणारी, दुरदृष्टीने विचार करणारी,विविध शाख-ेचे ज्ञान देणारी अग्रगण्य शिक्षण संस्था आहे.या दयानंद शिक्षण संस्थेच्या व महाविद्यालयाच्या माध्यमातून जास्तीत-जास्त दिग्गज साहित्यिक व आदर्श नागरिक निर्माण झाले पाहिजेत. साहित्य अकादमीच्या विविध योजनांचाही लाभ घेऊन दर्जेदार नवोदित लेखक अशा कार्यशाळेतून उदयाला आले पाहिजेत.

मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांनी साहित्य निर्मिती प्रक्रीयेपासून ते पुस्तक प्रसारीत होणे, एखाद्या पुरस्कारास पात्र होणे ह्या प्रवासात साहित्य अकादमी सारख्या संस्थांची काय मदत होते? साहित्य अकादमीच्या माध्यमातून साहित्यिक उपक्रमांना कसे पाठबळ मिळते ? याबद्दल जाणून घेण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन केले आहे. अशी भूमिका विशद केली. डॉ.सुभाष कदम यांनी आभार मानले तर सूत्रसंचालन प्रा.राजकुमार मोरे यांनी केले व प्रमुख पाहुण्याचा परिचय प्रा.अंगद भुरे यांनी करून दिले. याप्रसंगी प्रा.शिवाजी मोतीबोणे, डॉ.वैशाली बेटकर यांच्यासह विद्यापीठांतर्गत असलेल्या विविध जिल्ह्यातील प्राध्यापक, विद्यार्थी, संशोधक, मार्गदर्शक, अभ्यासक, साहित्यिक बहुसंख्येने उपस्थित होते. साहित्य अकादमीच्या योजनांची महिती देणारी अशी कार्यशाळा प्रथमच होते आहे. येणे फलदायी झाले अशा उत्तम प्रतिसादात कार्यशाळा संपन्न झाली.

# शिक्षण सम्राट , सहकार महर्षी,राजकारणातील राजहंस कै. इरवंतराव पाटील नरंगलकर

इरवंतराव लिंगप्पा पाटील नरंगलकर यांचा जन्म १२ डिसेंबर १९३६ रोजी नांदेड जिल्ह्यात देगलूर तालुक्यातील नरंगल (बु) , या गावात जन्म झाला। पाटील यांच्या वडिलांचे नांव लिंगप्पा पाटील होते तर त्यांच्या आईचे नाव पार्वतीबाई असे होते.

इरवंतराव पाटील यांचे प्राथमिक शालेय शिक्षण सन १९४० मध्ये नरंगल येथे पहिली ते तिसरी पर्यंत झाले तर पुढील शिक्षण ऑगस्ट १९४४ मध्ये तालुक्याच्या ठिकाणी देगलूर येथे झाले. उच्च शिक्षण घेण्यासाठी उस्मानिया विद्यापीठ हैद्राबाद येथे जावून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले . शिक्षण पुर्ण झाल्यानंतर कोणतीही नोकरी न करता आपल्या जन्म गावी परतले ते गावचा आणि परिसराचा विकासाचे स्वप्न घेऊन .

भ्रष्टाचार आणि स्वार्थाने बरबटलेल्या राजकारणात ध्रुव ताऱ्या प्रमाणे सदाचार ,त्याग ,निष्ठा सेवाभाव ,आणि सर्मपण या मुल्यावर अटळ राहून प्रकाशित होणाऱ्या दैदीप्यमान नक्षत्रासारखे पाटील यांचे आदर्श व्यक्तीमत्व होते .

समाजकारण,राजकारण,करत असताना विरोधक सुध्दा इरवंतराव पाटील यांच्या पुढे श्रध्देने झुकत असायचे. राजकारणात राहून संतत्वांचा सुगंध आपल्या व्यक्तीमत्वाने दरवळत होता . अनेक पदावर राहून त्यांनी सक्रिय समाज सेवा केली. ते अतिशय मनमिळावू ,सहकाऱ्याबदल आदर , आपुलकी ,संगठन कौशल्य ,व्यवहार चातुर्य,प्रसंगावधान,दुरदृष्टी ,निस्वार्थपणा यामुळे त्यांच्या समाजकार्याला एक उज्ज्वल झळाळी मिळाली होती . पदामुळे माणूस नव्हे तर माणसामुळे पदांना पदपण प्राप्त होते हे पाटलांनी आपल्या आदर्श जिवन शैलीने दाखवून दिले .

ते सन १९६० साली नरंगल सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन झाले आणि या संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या विकासासाठी नवे नवे संकल्प तयार केले . सेवा सोसायटीच्या सार्वजनिक कार्यातून शेतकऱ्यांसाठी अनेक विविध विकासकामे करण्याचा संकल्प केले त्यांनी गावातील खाजगी सावकारी बंद केले, सेवा सोसायटी अंतर्गत गावातील शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा चालू केले तसेच शेतकरी समृध्द होण्यासाठी विविध कार्यशाळेचे आयोजन केले . ,शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात खतपुरवठा करणे , शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळावा म्हणून शासकीय खरेदी विक्री करणे आदी कार्यामुळे नरंगल सेवा सहकारी सोसायटी नांदेड जिल्ह्यात एक नंबरवर गाजत होती त्यामुळे ते सहकार क्षेत्रातील एक समृध्द सहकार महर्षी म्हणून नावारुपास आले होते .

त्यावेळी सहकार विभागाने अकोला येथे इरवंतराव पाटील नरंगलकर यांचा सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला होता.

पाटील यांना अनेक विविध पदे मिळाले ते त्यांच्या कर्तत्वामुळे त्यांनी केलेले कार्य समाजासाठी हितवाह व



प्रेरणादायी होते .यांची मुळ संकल्पना शिक्षण,आरोग्य,शेती,समाजकारण,राजकारण होते.

सन १९६४ ते १९७० या काळात सुपरवायझिंग युनियनचे संचालक म्हणून काम पाहिले होते , त्यानंतर सन १९६६ ते १९७१ मध्ये नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकचे संचालक म्हणून काम पाहिले. सन १९७२ मध्ये देगलूर पंचायत समितीची निवडणूक अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविले आणि त्या निवडणुकीत बहुमताने निवडून आले आणि देगलूर पंचायत समितीच्या सभापती पदावर विराजमान झाले .यांच्या सभापती पदाच्या कार्यकाळात देगलूर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर विकास कामे केले गेले . तालुक्यातीळ दळणवळण ,नदीवर पुल बांधकाम करणे ,बंधारे बांधने तसेच शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळावे आणि ते जमिन सिंचनाखाली यावे ही संकल्पना पाटील यांनी सतत शासन दरबारी मांडली .

सन १९७४ मध्ये नरंगल येथील शेतकऱ्यांना व सुसक्षित बेरोजगारांना शासकीय कर्ज मिळावे या करीता मराठवाडा ग्रामीण बॅक नरंगल येथे मंजूर करून आणले यांच्या कार्यातून गावात बँक चालू झाली या बँकेमार्फत गावातील अल्पभूधारकांना कर्ज देवून त्या अल्पभूधारक शेतकऱ्यांचे उत्पन वाढविण्यासाठी प्रयत्न केले . तसेच तालुक्यातील शहापूर,मरखेल,हानेगाव ,नरंगल या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राची शासनाकडून मंजूरी आणून वरील गावात प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु केले. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी पंचायत समितीच्या माध्यमातून गावा गावात हातपंप (हापसे) बसवले.

सन १९७५ ते १९८५ या काळात गोदावरी मनार सहकारी साखर कारखाना या संस्थेचे संचालक म्हणून काम पाहिले . नरंगल येथे सन १९८७ मध्ये इंदिरा वाचनालयाची स्थापना करून वाचनसंस्कृती वाढविण्याचे काम केले.शेवट पर्यंत त्यांनी ग्रंथालय चळवळीत सहभागी राहिले.

सन १९८८ मध्ये औद्योगिक संस्थेचे संचालक म्हणून काम पाहिले त्यानंतर १९८९ ला खानापूर येथील नृसिंह सुतगिरणीचे संचालक म्हणून काम पाहिले त्यांनी नांदेड जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून काम केले,जिल्हा सहकारी बोर्डाचे काहीकाळ सदस्य होते तसेच सहकार समाचार नांदेड मासिकाचे संपादक म्हणूनही कार्य केले होते.

सन १९९२ मध्ये शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांच्या कार्यकाळात त्याच्या प्रोत्साहनामुळे त्यांना आलूर येथे विद्यानिकेतन विद्यालय या नावाने शाळेची परवानगी मिळालीयामुळे ग्रामिण भागात शिक्षणाची व्यवस्था झाली त्यानंतर सन १९९६ - १९९७ मध्ये पुन्हा शेवाळायेथे एक विद्या विकास विद्यालय नावाने शाळा मंजूर झाली .

नरंगल येथे चालूक्य काळातील विरभद्र मंदिर असून त्याच्या विकासासाठी सुद्धा त्यांनी सचिव च्या रूपात कार्य केले .

विद्यानिकेतन सोसायटी खानापूर या संस्थेचे अध्यक्ष, विद्या निकेतन विद्यालय आलूर ,विद्या विकास विद्यालय शेवाळा या शाळेचे अध्यक्ष, महात्मा बसवेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नरंगल या शाळेचे उपाध्यक्ष, शरणशांती वर्धक संस्था हनेगाव या संस्थेचे उपाध्यक्ष,ही विविध पदे त्यांनी भूषवली .

अनेक पदावर राहून सुद्धा ते निस्वार्थ भावनेने समाजासाठी कार्य केले. राजकारणात राहून सुद्धा त्यांच्यावर कधी भ्रष्टाचाराचे आरोप झाले नाहीत त्यामुळे त्यांना राजकारणातील राजहंस म्हणणे साजेसे ठरते .त्यांच्या प्रथम पुण्य स्मरणानिमित्त कोटी-कोटी अभिवादन .

**- लेखक :**
**गंगाधर पोतंगले नरंगलकर,**
सचिव
नांदेड जिल्हा ग्रंथालय कर्मचारी संघ नांदेड

# मुलींच्या व्यवसायिक शिक्षणाकडे कल वाढवण्यासाठी महिला नेतृत्वाने पुढाकार घ्यावा



लातूर - देशभरात प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र अंतर्गत व्यावसायिक शिक्षणावर भर दिला जात आहे व त्याद्वारे आर्थिक दृष्ट्या सक्षम बनावे तसेच सामाजिक जीवन कौशल्याचे शिक्षण प्राप्त करावे आणि सक्षम जीवन जगावे असे प्रतिपादन कलापंढरी सामाजिक संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त उदगीर तालुक्यातील कोदळी येथे आयोजित करण्यात आलेल्या महिला व किशोरी सन्मान सोहळ्यात क्राय मुंबईचे शैलेंद्र आनंद यांनी प्रतिपादन केले.

आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कलापंढरी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष बीपी सूर्यवंशी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते मनोज तवंडे, वैशाली जामकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना शैलेंद्र म्हणाले की उमेदद्वारे महाराष्ट्रात महिलांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणाची प्रक्रिया राज्य सरकार द्वारे महिला सक्षमीकरणासाठी राबवली जात आहे. या मार्फत संपूर्ण ग्रामीण भागात महिलांचे मजबूत संघटन झाले असून आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी महिला नेतृत्व करीत आहेत. या महिलांनी आपल्या मुलींना स्वावलंबी बनवण्यासाठी व्यावसायिक शिक्षण घेण्याची प्रेरणा द्यावी व मुलींनीपण करिअर घडवणे गरजेचे आहे. महिला व किशोरी सन्मान सोहळा दिनांक ८ मार्च ते १५ मार्च पर्यंत हा सप्ताह उदगीर तालुक्यातील नळगीर , जानापूर, आवलकोंडा ,नागलगाव , मल्लापुर, नावंदी , हेर, शंभू उमरगा, , गुरदाळ,आदीसह ३० गावातून जवळपास २ हजार महीला व दिड हजार किशोरी मुलींसाठी हा कार्यक्रम राबवला जाणार असल्याची माहिती कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी पी सूर्यवंशी यांनी दिली.

यावेळी महीला व किशोरी मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मोदीजिची गॅरंटी देशाला महासत्ता बनवेल : आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर



लातूर : प्रतिनिधी- भारतीय जनता पार्टीच्या वतीने संपूर्ण देशामध्ये विकसीत भारत रथ मोदी कि गॅरंटी हा रथ संपूर्ण देशभरात मोदीजीणी पुढील शासणाच्या कार्यकाळात कोणत्या योजणा राबवल्या पाहिजेत यांच्या सु-चणा जनतेकडून मागवल्या जात आहेत. त्या सुचनाचे पुढील शासन कार्यकाळात अमलबजावणी करन्याच्या योजणेतून ही यात्रा लातूर शहरात आली होती. त्याचे पुजन राष्ट्रीय किसान मोर्चाचे गोवा प्रभारी व गुजरात राज्याचे सह प्रभारी मा.आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेबांच्या हस्ते विकसीत भारत रथाचे पूजण श्रीफळ फोडूण सुरूवात करन्यात आली. यावेळी लातूर शहर जिल्हाअध्यक्ष देविदासराव काळे, प्रदेश युवा उपाध्यक्ष अजितसिंह पाटील, भटक्या विमुक्त आघाडीचे ला-तूर जिल्हा प्रभारी प्रदिप बांगर उपस्थीत होते.

नरेंद्र मोदीजीने आपल्या कार्यातून देशाला जगात सनमान मिळवुन दिला...

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी गेली १० वर्षे निस्वार्थपणे देशाचा सर्वांगीन विकास केला आहे. त्यामुळे भारत सन २०१४ आगोदर ११ व्या क्रमांकावर होता. आज तो ५ व्या क्रमांकावर आहे. येत्या वर्षात तो तिसऱ्या क्रमांकावर येईल असा रिपोर्ट जागतीक सर्वेणे दिला आहे. देशाच्या सर्व क्षेत्रात कृषि, उद्योग,शिक्षण, सामान्य व्यक्तीला मदत करण्याबाबत आनेक योजना राबवल्या आहेत. त्यामुळे भारताचे आर्थीक उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होउन परकीय चलन आज ६५० कोटी डॉलर आहे. देशातील २५ कोटी नागरीक गरीबीतूण बाहेर आले आहेत. जी-२० मध्ये अरबीयण देशाचा समावेश करून त्यांना सनमान संधी दिली त्यामुळे जागात भारताचा सन्मान वाढला असून जगातील ७८ टक्के जनता मोदीला पसंद करत असल्यामुळे राष्ट्रभक्त स्वामी विवेकानंदाची भविष्यवाणी भारत २१ व्या शतकात जगाचे नेतृत्व करेल हे नरेंद्र मोदीजी सिध्द करून दाखवतील असा विश्वास मा.आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी शहर युवा जिल्हाअध्यक्ष गणेश गोमचाळे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुर्यकांतराव शेळके, प्रतापराव शिंदे, लातूर शहर माजी नगरसेवक सुभाषअपा सुलगुडले, भटक्या विमुक्त जाती जिल्हाअध्यक्ष नवनाथ टेंकाळे, जिल्हा शहर सरचिटणीस शिरिष कुलकर्णी, ॲड.दिग्वीजय काथवटे, श्री.सावंत उपस्थीत होते.व शेकडो कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थीत होते.

# नारीशक्ती महिला बचत गटाच्या महिलांनी संस्कारातून आपले आणि आपल्या मुलांचे आरोग्य अबाधित ठेवण्याचे काम करावे

लातूर / प्रतिनिधी- महिला दिनाची सुरुवात भारतात १९४३ पासून करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर १९५० पासून भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना समानतेचा अधिकार दिलेला आहे. परंतु त्यावेळीही समाजामध्ये म्हणा-वी तशी जनजागृती नसल्यामुळे महिलांना गुलामगिरीत ठेवण्याचे काम केले. महिलांचे कार्यक्षेत्र चुल आणि मूल यापुरते मर्यादित ठेवल्यामुळे त्यांना म्हणावी तशी प्रगती साधला आलेली नाही. त्यामुळे अशा प्रवृत्तीविरोध लढा उभा करण्याचे काम महिलांनी एकजुटीने केले आणि तेव्हापासून ८ मार्च १९७७ पासून जागतिक महिला दिन साजरा करण्यात येऊ लागला. राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या संस्कारातून छत्रपती शिवराय घडले, याबरोबरच सावित्रीबाई फुले यांच्या संस्कारातून अनेक महिलांना शिक्षणाच्या प्रव-ाहात आणण्याचे काम केले त्यामुळे भारत देशातील महिलांना सन्मानाची वागणूक मिळू लागली त्यामुळे यापुढील कालावधीतही महिलांनी संस्कारातून आपले आणि आपल्या मुलाचे आरोग्य अबाधीत ठेवण्याचे काम करावे असे प्रतिपादन एमएमएचे अध्यक्ष तथा हृदयविकार तज्ज्ञ डॉ.रमेश भराटे यांनी केले.



यावेळी ते नारीशक्ती महिला बचत गट, जेएसपीएम शिक्षण संस्था लातूर, गायत्री हॉस्पिटल आणि लिनेस क्लब लातूर यांच्या विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक सभागृह, विवेकानंदपुरम एमआयडीसी, लातूर येथे आयोजित आरोग्य मार्गदर्शन शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेएसपीएम संस्थेच्या सचिव सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून आय.एम.ए.च्या माजी अध्यक्षा डॉ.सुरेखाताई काळे, कॅन्सर तज्ज्ञ डॉ.अजयजी पुनपाळे, माणसशास्त्र तज्ज्ञ प्रा.उर्मिलाताई भंदरगे, जेएसपीएमचे समन्वयक संचालक निळकंठराव पवार, लिनेस क्लब लातूरच्या रिजन कोऑर्डनिटर साधना पळसकर, विद्याताई देशमुख, वर्षाताई रमेश भराटे, लिनेस क्लब लातूरच्या अध्यक्षा लि.सुवर्णा महाजन, कौशल्या खोसे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्याहस्ते राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नारीशक्ती महिला बचत गटाच्या अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांनी केले. प्रारंभी प्रमुख मान्यवरांचा सन्मानही संयोजन समितीच्यावतीने करण्यात आला. लिनेस क्लबच्या माजी प्रांतपाल लि.सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर व लि.विद्याताई देशमुख यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सन्मान करण्यात आला. याबरोबरच उद्योग क्षेत्रामध्ये यशस्वी भरारी घेणाऱ्या महिला उद्योजकांचा सन्मान मान्यवरांच्याहस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दैवशाला पाटील यांनी केले तर आभार जयश्रीताई देशमुख यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाला महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

स्वजाणीव, स्वप्रकाश अन् समाजविकासाचा ध्यास घेऊन समाजकार्यात सक्रीय रह-ावे - माजी जि.प.अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर

सध्याच्या स्पर्धेच्या युगामध्ये महिला कुठल्याही क्षेत्रात कमी नाहीत. प्रत्येक क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून महिला सक्रीयपणे कार्य करीत आहेत. त्यामुळे यापुढील कालावधीतही महिलांनी स्वजाणीव, स्वप्रकाश अन् समाजविकासाचा ध्यास घेऊन समाजकार्यासह प्रत्येक क्षेत्रामध्ये सक्रीयपणे काम करावे असे प्रतिपादन नारीशक्ती महिला बचत गटाच्या अध्यक्षा तथा लातूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांनी केले.

# १४ मच्छिमारांचा शोधासाठी पाक घेणार भारताची मदत

इस्लामाबाद : पाकिस्तानातील सिंध प्रांतातील केटी बंदर पोर्टजवळ ४५ मच्छिमारांना घेऊन जाणारी बोट बुडाली. या बोटीतील ३१ मच्छिमारांची सुटका करण्यात आली, मात्र १४ मच्छीमार अद्याप बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेण्यासाठी पाकिस्तान सरकार भारताची मदत घेणार आहे.

पाकिस्तानी मीडिया द डॉननुसार, खासदार आगा रफिउल्ला यांनी सांगितले की मच्छिमारांचा शोध घेण्यासाठी भारताकडून मदत घेण्याबाबत त्यांनी पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि सिंधचे मुख्यमंत्री सय्यद मुराद अली शाह यांच्याशी चर्चा केली आहे. ते म्हणाले पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे बेपत्ता मच्छिमार भारताच्या हद्दीत गेले असावेत अशी भीती आम्हाला वाटते. या प्रकरणांमध्ये भारत सरकारकडून मदत घेण्यात यावी असा प्रस्ताव आम्ही मांडला. यावर पंतप्रधान शाहबाज शरीफ म्हणाले की, पाकिस्तान सरकार याप्रकरणी भार-ताशी चर्चा करेल आणि त्यांची मदत घेईल. ५ मार्च रोजी बुडाली बोट खासदार आगा रफिउल्ला म्हणाले की ४५ मच्छिमारांनी भरलेली बोट ५ मार्चला बुडाली. शोध-बचाव मोहिमेदरम्यान आम्ही ३१ मच्छिमारांना वाचवले होते. मात्र अपघात होऊन ५ दिवस उलटले तरी १४ मच्छीमार बेपत्ता आहेत. हे सर्व माझ्या मतदारसंघातील कराची येथील रहिवासी आहेत. मी त्याच्या कुटुंबाच्या संपर्कात आहे. १ फेब्रुवारी रोजी भारतीय नौदलाने सोमवारी सोमालियाच्या पूर्व किना-याजवळ अरबी समुद्रात १९ पाकिस्तानी खलाशांचे प्राण वाचवले. इराणच्या ध्वजांकित जहाजाचे ११ समुद्री लुटे-यांनी अपहरण केले होते. यानंतर नौदलाने जहाजाच्या सुटकेसाठी आपली युद्धनौका आयएनएस सुमित्रा पाठवली.

# उजनीचे पाणी जेऊर बोगद्यामधून सिनाकोळेगाव धरणात डिसेंबरपर्यंत आणणार





परंडा दि.१० (प्रतिनिधी) - मराठवाडयाच्या व धाराशिव जिल्हयाच्या हक्काचे कृष्णा खो-यातील उजनीचे पाणी जेऊर बोगद्यातून मिरगव्हाण मार्गे सिना कोळेगाव धरणात येत्या डिंसेबर २०२४ पर्यत आणणार असे आश्र्वासन राज्याचे आरोग्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत दि.१० मार्च रोजी दिले.

उजनी धरणातील ७ टीएमसी पाणी सिना कोळेगाव धरणात आणण्याचे काम सुरू आहे. करमाळा तालुक्यातील जेऊर दहिगाव येथील बोगदा शाफ्ट क्रमांक १ येथे ते बोलत होते. डॉ सावंत यांनी दहिगाव येथील उजनी - सिना कोळेगाव बोगदा कामाची पाहणी केली. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, केशव सावंत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख दत्ताअण्णा साळुंके, सुरज साळुंके, प्रा.गौतम लटके, मोहन पणुरे, माजी नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांच्यासह अधिक्षक अभियंता भारत शिंगाडे, कार्यकारी अभियंता प्रवीण चावरे, उप अभियंता थोरात यांच्यासह शिवसैनिक व जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोगदा कामाचे ठेकेदार होनाई कन्सट्रक्शन व बीटी पाटील कंपनी यांच्याकडून मंत्री सावंत यांचा सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना प्रा डॉ सावंत म्हणाले की, मला हद्दपार करण्याची भाषा करणारे ज्ञानेश्र्वर पाटील यांनाच परमेश्र्वराने हद्दपार केले होते. सावंतमुळेच ते आज आहेत, अशि आक्रमक शब्दांत सावंत यांनी मिरगव्हाण येथील वचनपुर्ती सोहळ्यात उध्दव ठाकरे यांच्यासह खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर व माजी आमदार ज्ञानेश्र्वर पाटील यांच्यावर जाहीर सभेत जोरदार हल्ला बोल केला. यावेळी त्यांनी खा, ओमराजे निंबाळकर यांच्यावर जोरादार टिका करताना शंभर बापाच्या पोराला व पक्षाला मी १० कोटी रुपये निधी देऊन निवडून आणले. धाराशिवचा खासदार केले अशी जहरी टिका केली. तर उध्दव ठाकरे यांचा त्यांनी महामूर्खमंत्री म्हणून उल्लेख केला. उजनी सिना बोगद्याच्या पंप हाऊस येथे या वचनपुर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ताअण्णा साळुंखे यांच्यासह वरील मान्यवर व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विशाल देवकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. मंत्री सावंत यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास परंडा - भूम - वाशी तालुक्यातील शेतकरी मोठ्या उपस्थित होते.



## देसा पवार यांचे निधन

देगलूर(प्रतिनीधी) : तालुक्यातील हानेगाव येथील रहिवाशी जेष्ठ नागरिक देसा भुरा पवार (९३ वर्ष) यांचे रविवार दिनांक १० मार्च रोजी पहाटे ५:३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवारी सायंकाळी ५.३० वाजता अंत्य संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा,दोन मुली,जावई ,सुन,नातवंडे असा परिवार आहे. ते मानव्य विकास विद्यालय देगलूर येथील सह शिक्षक गोविंद पवार यांचे वडील होत.

## करडखेल येथील मनोहर पांचाळ यांच्या शेतातील दोन एक्कर उभा ऊस शॉर्टसर्किटने जळून खाक

उदगीर (प्रतिनिधी) करडखेल येथील शेतकर्याचा उभा ऊस शार्टसर्किट लागून जळुन खाक झाला आहे. उदगीर शहराजवळ असलेल्या करडखेल येथील गट नंबर३९० मधिल शेतकरी मनोहर माणिकराव पांचाळ यांच्या शेतातील उभा ऊस दि.५ मार्च रोजी विजेच्या शार्टसर्किट लागून जळून खाक झाला आहे.

शेतकरी मनोहर पांचाळ यांचा काढणीसाठी आलेला ऊस अचानक झालेल्या शार्टसर्किटने जळुन खाक झाल्याने याचा पंचनामा करुन नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकरी मनोहर पांचार यांनी तहसिलदार कृषी विभाग व महावितरण कंपनी कडे निवेदनाव्दारे केली आहे.



## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत

मा.के.ए.पोवार,२रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळअर्ज क्र.१८२ /२०२४

निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Champabai W/o Sopan Kendre हे R/0 Borgaon (Kh) tq.Jalkot Dist Latur दि.29/06/2023 रोजी at. Borgaon (Kh) tq.Jalkot Dist Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1)Premla W/o. Vishambhar Chole , -ge--51,Occ.-Household.

2) Madhav S/o. Sopan Kendre , -ge--49,Occu--gri

Borgaon (Kh) tq.Jalkot Dist Latur

3)Satyawati W/o Shivchandra Nagargoje -ge -44 ,Occu- H.H.

4) Ganesh S/o Sopan Kendre ,-ge-40,Occu---ri

खालिल नमुद चार व्यक्ती हे मयताचे वारस असुन

1)Premla W/o. Vishambhar Chole , -ge--51,--Daughter

2) Madhav S/o. Sopan Kendre , -ge--49,--Son

3)Satyawati W/o Shivchandra Nagargoje -ge -44 ,--Daughter

4) Ganesh S/o Sopan Kendre ,--Son

अर्जदार यांनी Champabai W/o Sopan Kendre या नावाचे त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू उहरारिलरळ थ/ डेरिप घशपवीश यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक०६/०३/ २०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढुल तारीख:-१५/०४/२०२४

(के.डी. सीर्यवंशी )
कनिष्ठ लिपीक
२रे सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

आदेशावरुन
(एस.एम.शेटे)
सहाय्यक अधिक्षक
सहदिवाणी न्यायालय
क.स्तर,उदगीर

पान १ वरून

### उद्धव ठाकरेंच्या...

करावा लागणार का? असा सवाल निरुपम यांनी केला आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, जी उमेदवारी तुम्ही जाहीर केली आहे ती घोषणा मागे घ्यावी. ही जागा आधीपासून काँग्रेस पक्षाची आहे. अमोल कीर्तिकर लहान होते तेव्हापासून, त्यांना माहीत पण नसेल की ही जागा काँग्रेसची आहे. मी निवडणूक लढवणार, आता जागावाटपाचा निर्णय होऊ द्या. जागा कोणाला जाते बघू. त्यानंतर माझी भूमिका सांगणार असल्याचे निरुपम म्हणाले.

### भाजप खासदार...

१० जागा आहेत. भाजपने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत सर्व जागांवर विजय मिळवला होता.

ब्रिजेंद्र सिंह यांनी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये ३,१४,०६८ मतांनी विजय झाले होते. ते केंद्रीय मंत्री बिरेंद्र सिंह यांचे पुत्र आहेत. तसेच त्यांनी आएएसची नोकरी सोडून राजकीय कारकीर्दीला सुरुवात केली होती. त्यांचे वडील बिरेंद्र सिंह २०२२ पर्यंत राज्यसभा खासदार होते. ते पाचवेळा उचाना मतदारसंघातून आमदार होते. तसेच हरियाणा सरकारमध्ये मंत्री देखील राहिले आहेत.

### बदनामीकारक...

प्रकाशित केली होती. भारतात सध्या निवडणुकाचे वातवर आहे. अशावेळी चुकीच्या बातम्यांचे समर्थन केले जाणर नाही. ते सहन केले जाणार नाही. भ्रामक बातम्यांमुळे निवडणुकीचे वातावरण प्रभावित होऊ नये यासाठी हा सतर्क राहून हा निर्णय घेण्यात आल्याचेहि मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले.

### क्रिस्टिना...

गायक शाननेही आपल्या मधुर गाण्यांनी या कार्यक्रमात रंगत आणली. २८ वर्षांनंतर मिस वर्ल्ड स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याआधी १९९६ मध्ये बंगळुरू येथे ४६ व्या विश्व सुंदरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

भारताला पहिला विश्व सुंदरी किताब कधी मिळाला?

साल २०१७ नंतर भारताच्या एकाही सौंदर्यवतीला

विश्व सुंदरी किताब मिळाला नाही. तर भारताला विश्व सुंदरीचा पहिला किताब रीटा फारिया पॉवेल या सौंदर्यवतीला १९६६ साली मिळाला होता. विश्व सुंदरीचा किताब मिळवणा-या त्या पहिल्या भारतीय होत्या. यानंतर ऐश्वर्या राय-बच्चन १९९४, डायना हेडन १९९७, युक्ता मुखी १९९९, प्रियंका चोप्रा २०००, मानुषी छिल्लर हिला २०१७ साली हा किताब मिळाला होता.

### ईडीने लालू...

आणि त्याच्याशी संबंधित अनेक मुद्द्यांवर त्याची सखोल चौकशी करेल. या अटकेनंतर आगामी काळात सुभाष यादव यांच्याशी संबंधित प्रकरण आणि अनेक राजकीय व्यक्तींशी असलेले त्यांचे संबंधही समोर येऊ शकतात.

### मोदी पंतप्रधान...

आपण सगळे आहोत

नरेंद्र मोदींनी नवीन संसद भवनाला संविधान सदन हे नाव दिले आहे. २६ नोव्हेंबर हा दिवस देशभर संविधान दिन म्हणून देशभर पाळण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे असे नरेंद्र मोदी संविधान बदलणे शक्य नाही. संविधानाचे संरक्षण करण्यासाठी आपण सगळे आहोतच, असे रामदास आठवले म्हणाले.

### देशासह...

होत असून उन्हाचा चटका वाढल्याने घराबाहेर पडणे तापदायक ठरत आहे. उकाडा वाढल्याने घामाच्या धारा देखील वाहू लागल्या आहेत. विदर्भापासून मराठवाडा, कर्नाटक ते दक्षिण तामिळनाडूपर्यंत समुद्र सपाटीपासून ९०० मीटर उंचीवर हवेचा कमी दाबाचा पट्टा विस्तारला आहे. तर दक्षिण ओडिशा आणि परिसरावर चक्राकार वारे वाहत आहेत.

## राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक येथे पालक मेळाव्याचे आयोजन

औसा- हासेगाव येथील श्री वेताळेश्र्वर शिक्षण संस्था संचलित राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्निक मधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी पालकांशी संवाद साधण्याकरीता पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम सरस्वती प्रतिमेचे पूजन करून हिवाळी परिक्षा २०२३ महाविद्यालयातून प्रथम द्वितीय क्रमांक पटकाविलेल्या विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव वेताळेश्वर बावगे कोषाध्यक्ष शिवलिंग जेवळे प्राचार्य मेतगे एस पी, प्राचार्या योगिता बावगे- मेतगे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व चालु शैक्षणिक वर्षाबाबत सविस्तर माहिती प्रा पाटील डी पी यांनी सांगितली. प्राचार्य मेतगे एस पी सरांनी पालक मेळावा घेण्यामागील उद्देश सांगुन पालकांनी पाल्यांच्या गुणवत्ता, शारीरिक स्वास्थ्य व कौशल्ये याकडे लक्ष देणे गरजेचे असुन , विद्यार्थी उद्योजक व्हावा असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष वेताळेश्वर बावगे सरांनी प्रतिकूल परिस्थितीत यश कसे मिळवावे याबद्दल मार्गदर्शन करून कठोर परिश्रमाकरिता पालकांनीही विद्यार्थ्यांकडे लक्ष देण्याचे आवाहन केले. पालक व शिक्षकांमध्ये समन्वय असावा. स्वतः ची महती कायम ठेवण्यासाठी जगात काय सुरु आहे याकडे लक्ष दिलात तर नक्कीच चांगले इंजीनियर घडतील. म्हणून संघटित काम करावे असे उत्साहपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे कोषाध्यक्ष शिवलिंग जेवळे सरांनी पालकमेळाव्यामागील मुख्य उद्देश पालक, शिक्षक व व्यवस्थापन यांच्यात चर्चा होऊन विद्यार्थ्यास येणार्या अडचणी दूर करण्यासाठी असुन, नियमित अभ्यास करून नामांकित कंपनीत नोकरी कशी मिळवावी त्या करीता वेळेचे नियोजन करावे. त्यानंतर मोबाईल दुष्परिणामांची जाणीव पालकांना करून दिली. टिव्ही मोबाईल मध्ये विद्यार्थी जास्त वेळ गुंतून राहणार नाहीत याची पालकांनी काळजी घ्यावी व अशा साधनांपासून विद्यार्थ्यांस दुर ठेवावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा राजमाने एम एस तर आभार प्रा लोमटे एम डी यांनी मांडले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष भिमाशंकर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, प्रा सोनहिवरे एम जी, प्रा गायकवाड एस एन, प्रा पंचाक्षरी एस एम, प्रा ताडके के डी, प्रा कल्याणकर एस ए, प्रा कोरे आर एस, प्रा सांगवे आर एस, प्रा गवळी बी आर, प्रा शेख टि एस, पाटील ए आर, ग्रंथपाल मनदीप सवाई , विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## उमरी मध्ये तरुणाची गळा चिरून हत्या

नांदेड(प्रतिनीधी): नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील कळगाव येथेकिरकोळ कारणावरून झालेल्या वादातून आखाड्यावर झोपलेल्या तरुणाचा धारदार शस्त्रांनी गळा चिरून निर्दयीपणे हत्या करण्यात आली. घटनेनंतर संशयित आरोपींनी गाव सोडून पलायन केले असून, पोलिस त्यांचा कसून शोध घेत आहेत.



उमाकांत गोविंद नंदगाये (वय २३ वर्षे, रा. कळगाव, ता. उमरी) असे या घटनेत हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. ९ मार्च रोजी सकाळी ही घटना उघडकीस आली.

रोजच्या प्रमाणे सकाळी उमाकांत शेतावरून घरी आला नाही. त्याचा चुलतभाऊ महेश नंदगाये याने फोनवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; पण फोन उचलला नाही. त्यामुळे तो शेतातील आखाड्यावर पोहोचला. त्यावेळी गळा चिरलेल्या अवस्थेत व रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या उमाकांतचा मृतदेह त्याला दिसला. त्यानंतर त्याने पोलिसांना ही माहिती दिली. माहिती प्राप्त झाल्यावर उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत संपते, पोलिस निरीक्षक अंकुश माने यांनी घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मयत उमाकांत हा दररोजच्या प्रमाणे आखाड्यावर झोपायला गेला होता. संशयित आरोपीचे शेत हे जवळच असल्याने त्याला याबात माहीत होते. अगोदर झालेल्या वादाचा राग मनात धरून सदरील हत्या केल्याची तक्रार महेश नंदगाये यांनी उमरी पोलिसांत केली. घटना घडताच संशयित आरोपी यांनी घराला कुलूप

लावून रातोरात गावातून पलायन केले. याप्रकरणी बालाजी यशवंत धुतुरे, पुरुषोत्तम बाबू सरोदे, माधव यशवंत धुतुरे, राहुल बाबू सरोदे, माधव कोडोपंत तारू, यशवंत गंगाराम धुतुरे या सहा आरोपींविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला.

आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची वेगवेगळी तीन पथके रवाना झाली आहेत. शनिवारी सकाळी कळगाव शिवारातील घटनास्थळी पोलिसांचे श्र्वानपथक तसेच फॉरेन्सिक टीमने भेट देऊन माहिती गोळा केली.

सदर हत्येप्रकरणी उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत संपते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अंकुश माने हे पुढील तपास करीत आहेत.




उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो




उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ | डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) | डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) | डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष | व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर | लॉ. प्रदिप बेंद्रे सचिव



## दुकान भाडयाने देणे आहे

शिवाजी चौक देगलूर रोड उदगीर १८ x ६५ ची ३ मजली ईमारत भाडयाने देणे आहे.

संपर्क
शिवशंकर नागठाणे
मो.नं. ९८९०७१८५०५
मो.नं. ८३८०८३५५७५
मो.नं. ८६००१८६५५८



यशवंत

सोमवार दि. ११ मार्च २०२४



उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# श्री हावगीस्वामी महाविद्यालय ऊर्जा देणारी संस्था



उदगीर प्रतिनिधी श्री हावगीस्वामी महाविद्यालयाला आदरणिय शिवराजपाटिल चिकुरकर साहेबांचे आशिर्वाद लाले असुन भारत लिबर एज्युकेशन संस्था ऊर्जा देणारी संस्था आहे असे उदगार राज्याचू क्रिडा व युवक कल्याण बंदरे मंत्री ना.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

श्री हावगीस्वामी महाविद्यालयातील इनडोअर स्टेडियमचे उद्घाटन क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्या शुभहस्ते संपन्न श्री हावगीस्वामी महाविद्यालयातील इनडोअर स्टेडियमचे उद्घाटन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण बंदरे मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अँड गुणवंतराव पाटील हैबतपूरकर यांनी भूषविले.विचारपीठावर अहमदपूरचे आमदार बाबासाहेब पाटील,डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे, संस्थेचे सचिव उमेश पाटील देवणीकर, संस्थेचे उपाध्यक्ष शिवकुमार हसरगुंडे, उपाध्यक्ष संगमेश्र्वर जिरगे, सहसचिव प्रभुराज कप्पीकेरे, कोषाध्यक्ष शंकरप्पा हरकरे, रमेशअण्णा अंबरखाने, संस्थेचे सदस्य गिरीश पाटील कौळखेडकर,सौ.मिराताई शिवपुजे,सौ.डॉ मनीषा वडियार, रवि हसरगुंडे, वीरेंद्र स्वामी, सुबोध आंबेसंगे,अजय डोणगावकर, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. एन.जी.येमेकर, उपप्राचार्य डॉ.आप्पाराव काळगापुरे, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य राजेंद्र पाटील,माजी नगराध्यक्ष सुधीरभाऊ भोसले,प्रा. श्याम डावळे, बालाजी भोसले हंडरगुळीकर,आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी श्री हावगीस्वामी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी सर्व मान्यवरांचे स्वागत शाल श्रीफळ देऊन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविकात संस्थेचे सचिव उमेश पाटील देवणीकर यांनी भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीची परंपरा सांगून श्री हावगीस्वामी महाविद्यालयानी क्रीडा क्षेत्रात जे नावलौकिकाची माहिती दिली. यावेळी सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की, श्री हावगीस्वामी महाविद्यालय आणि संस्था एक कुटुंब आहे.भारत लिबरल एज्युकेशन संस्थेला मागण्याची सवय आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर साहेबांनी लागू दिली नाही.संस्थेने मागण्यांच्या अगोदरच साहेबांनी संस्थेला मदत केली आहे अशी भावना व्यक्त करून संस्थेसाठी स्वतंत्र क्रीडा महाविद्यालयाची मागणी क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्याकडे त्यांनी केली. अहमदपूरचे आमदार बाबासाहेब पाटील यावेळी विचार व्यक्त करताना म्हणाले की,या महाविद्यालयावर अनेकांचे आर्शीवाद असल्याचे नमूद करून उदगीरला अनेक वर्षांची शैक्षणिक सांस्कृतिक परंपरा आहे.उदयगिरी महाविद्यालय म्हणजे डोळे सरांचे कॉलेज अशी ओळख त्यांनी निर्माण केली तशीच स्वतंत्र ओळख शिक्षकांनी निर्माण केली पाहिजे.लातूर जिल्ह्याच्या शैक्षणिक गुणवत्तेची सुरूवात उदगीरपासून झाली असून उदगीरला व्हॉलीबॉल खेळाची जुनी परंपरा आहे. देशाची शिस्त त्या देशाच्या गृहमंत्र्यांवर अवलंबून असते, तशीच महाविद्यालयाची शिस्त ही त्या महाविद्यालयाच्या क्रीडा शिक्षकांवर अवलंबून असते. पालकांनी पाल्याची आवड पाहून शिक्षण द्यावे.संपत्तीपेक्षा संततीकडे अधिक लक्ष द्यावे असे विचार यावेळी त्यांनी व्यक्त केले.

यावेळी ना. क्रीडामंत्री संजयजी बनसोडे बोलताना म्हणाले की, ही संस्था उर्जा देणारी आहे.लाईफ केअर हॉस्पिटलला जी मदत हवी असेल ती देण्याची इच्छा त्यांनी यावेळी व्यक्त केली.मी संस्थात्मक काम केले पाहिजे अशी आपली अपेक्षा आहे.माझी संस्था माझी जनताच आहे.आमदारकीच्या काळात किती आणि कोणकोणते कामे केली याची माहिती देऊन,जनतेची सेवा करणे, तसेच त्यांच्या मदतीसाठी आपण नेहमी तत्पर असल्याचे आवाहन ही यावेळी त्यांनी केले. व महाविद्यालयाच्या शैक्षणिक विकासासाठी सर्वतोपरि मदत करण्याचू आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड गुणवंतराव पाटील हैबतपूरकर यांच्या वतीने संस्थेचे उपाध्यक्ष शिवकुमार हसरगुंडे यांनी केले.यावेळी उपस्थितांचे आभार डॉ.म.ई.तंगावार यांनी मानले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील तसेच संग्राम शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उदगीर शहरातील नागरिक तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उदयोत्सवाचा दुसरा दिवस रंगला खाद्य आणि सांस्कृतिक मेजवानीने



उदगीर : (प्रतिनिधी) येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ च्या निमित्ताने विविध खाद्यपदार्थांचे स्टॉलच्या माध्यमातून भव्य आनंदनगरीचे आयोजन करण्यात आले होते. याला विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. या आनंदनगरीचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आर.के.मस्के, विद्यार्थी कल्याण मंडळ प्रमुख डॉ.एस.एन.लांडगे, आनंद नगरी समिती प्रमुख डॉ.एम. पी.मानकरी, डॉ.मल्लेश झुंगास्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रतीवर्षाप्रमाणे महाविद्यालयाच्या स्थापनेपासून महाविद्यालयात संपन्न झालेल्या कार्यक्रमाच्या फोटो ग्रंथालयात जतन करून ठेवले आहेत त्या फोटोचे प्रदर्शन ग्रंथालयातर्फे करण्यात आले.

त्याची उद्घाटन माजी प्रा.बी.बी.शेख तसेच १९८० बॅचच्या माजी विद्यार्थिनी कोचेवाड मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सदस्य बसवराज पाटील नागराळकर, सदस्य महादेवअप्पा नौबदे आणि बसवराज पाटील मलकापूरकर हे उपस्थित होते, प्रदर्शन पाहण्यासाठी माजी विद्यार्थी आणि आजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. विज्ञान विभागातर्फे विज्ञान प्रदर्शन सादर करण्यात आले.

यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रात्यक्षिक तसेच पोस्टर्स प्रदर्शित केले. उर्दू विभागातर्फे उर्दू शायरी चा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये उर्दू विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवून विविध सुप्रसिद्ध शायरी सादर केल्या. यासाठी उर्दू विभागातील विभाग प्रमुख प्रा.डॉ.हमीद अश्रफ आणि प्रा.डॉ.मकबूल अहमद यांनी विशेष प्रयत्न केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सचिव रामभाऊ तिरुके यांच्या उपस्थितीत करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अंतर्गत वैयक्तिकनृत्य, समूहनृत्य, गीत गायन, समूह गायन, स्किट आणि विडंबन इत्यादी कलाप्रकारात ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून, एकूण ३३ कलाप्रकार सादर केले. यामध्ये विशेषतः मुलींची संख्या मोठ्या प्रमाणात होती. विद्यार्थ्यांना प्रशिक्षक म्हणून सुनील ममदापुरे अमित सोनकांबळे यांनी कार्य केले. सांस्कृतिक समिती चे प्रमुख प्रा.डॉ.बी.एस.भुक्तरे आणि प्राचार्य डॉ.आर.के.मस्के यांनी यासाठी मार्गदर्शन केले.

# मलकापुरसाठी निधी कमी पडू देणार नाही- ना.बनसोडे





उदगीर (प्रतिनिधी) मलकापुरच्या विकासासाठी मागुल काळात मोठ्या प्रमाणात निधी दिला असुन याढिल काळा त विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन -ना.संजय बनसोडे यांनी दिले.

ग्राम पंचायत कार्यालय मलकापुर यांच्या वतीने ग्राम निधी अंतर्गत अपंग व दिव्यांग त्याच बरोबर महिला बालकल्याण अंतर्गत लाभधारकांना निधीच्या चेक चे वाटप कार्यक्रम रविवार दिनांक १० मार्च रोजी ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले या प्रसंगी ना.संजय बनसोडे बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सरपंच गुरुनाथ बिरादार हे होते तर व्यासपिठावर उपसरपंच महेबुब भाई शेख,गटविकास अधिकारी प्रवीण सुरोडकर ,तहसीलदार राम बोरगांवकर , भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अमोल निडवदे, बापुराव राठोड,राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष बालाजी भोसले पाटील, कार्याध्यक्ष वसंत पाटील, माजी उप नगर अध्यक्ष फैजु खान ,मुकेश भालेराव, ग्राम पंचायत सदस्य सतीश बिरादार, जितेंद्र बोडके, महेश तोडकर, गंगाधर पवार,सतिष पाटिल,राजेंद्र भालेराव,आशा बी शेख,अतिक शेख आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना ना.संजय बनसोडे म्हणाले की, माझे घर मलकापूर असून या ठिकाणचा रहिवाशी आहे. पाणी पुरवठ्याचे काम अंतिम टप्यात असल्याने पाण्याचा प्रश्र्न कायम स्वरुपी मिटणार आहे. मलकापुर शहरालगतचा रिंग रोड चार पदरी होणार असल्याने मलकापूर हे मोठे शहर म्हणून नावा रुपाला येणार असल्याचे सांगीतले. मलकापूर ग्रामपंचायचे ग्रामसेवक संतोष पाटिल यांना विकास करण्याचा चौफेर अभ्यास असल्याचू सांगून कार्याचे तोंड भरुन कौतूक केले. या प्रसंगी अमोल निडवदे यांनी मलकापूर ग्रामपंचायत मार्फत स्व निधीतून दिव्यांगांना आर्थिक मदत देणारी एकमेव ग्राम पंचायत असल्याचे सांगून ग्रामपंचायचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात ग्रापसदस्य जितेंद्र बोडके यांनी ग्रा.प.च्या चोवदा महिन्यात विविध योजनेतून केलेल्या विकास कामाची माहिती दिली. संचलन हलगरे यांनी तर आभार ग्रामसेवक संतोष पाटिल यांनी मानले. कार्यक्रमास दिंगबर बिरादार, सुरेश राजपाल,अशोक कप्ते,भरत दिक्षीत, दिनेश पाटिल, यांच्या सह मलकापूर ग्र.प.हद्दीतील सर्व स्तरातील महिला पुरुष मोठ्या संखेंने उपस्थित होते.

# उदयोत्सवात सादर झाल्या समाज प्रबोधन करणाऱ्या एकांकिका



उदगीर / प्रतिनिधी- येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलनाची आजपासून सुरुवात झाली. उद्घाटनानंतर पाच भाषेत सादर झालेल्या एकांकिकेतून समाज प्रबोधनाचा प्रयत्न करण्यात आला.

कन्नड विभागातर्फे महात्मा बसवेश्वर आणि त्यांचे भक्त, उर्दू विभागातर्फे आजच्या पालकांना भेडसावणारे प्रश्न, हिंदी विभागातर्फे हुंडाबळी, इंग्रजी विभागातर्फे मोबाईलचे वेड तर सांस्कृतिक विभागातर्फे मोबाईल मुळे पालक आणि त्यांचे पाल्य यांच्यात होणारे मतभेद अशा विषयावर एकांकिका सादर झाल्या. सर्व एकांकिका समाजातील भेडसावणाऱ्या प्रश्नांना सादर करणाऱ्या होत्या, त्याचबरोबर प्रेक्षकांच्या मनात असलेल्या प्रश्नांची उकल करणाऱ्या आणि हृदयाला भिडणाऱ्या पद्धतीने सादर करण्यात आल्या. प्रेक्षकांनी सर्व एकांकिकांना भरभरून प्रतिसाद दिला. यासाठी सर्व भाषेचे विभाग प्रमुख त्यांचे सहकारी यांनी कार्य केले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के.मस्के यांचे मार्गदर्शन लाभले.

# जागतिक महिला दिनानिमित्त महिला वाचक मेळावा



शिरुर अनंतपाळ(प्रतिनिधी )श्री छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक वाचनालय, शिवपुर येथे जागतिक महिला दिन उत्साह साजरा करण्यात आला. याप्रसंगी सौ. जगदेवी सुगावे मॅडम यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी जागतिक महिला दिनानिमित्त आयोजीत करण्यात आलेल्या ग्रंथप्रदर्शन व महिला वाचक मेळाव्याचे उद्घाटन सौ जगदेवी सुगावे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना प्रत्येक महान व्यक्तींच्या जीवनात आणि यशात स्त्रियांचा सिंहाचा वाटा आहे. प्रत्येक स्त्री ही तिच्या आयुष्याच्या प्रत्येक वळणावर जीव झोकून आपले सर्वस्व देत असते. कुटुंबाची जबाबदारी, मुलांचे संगोपन, करिअर, मित्रमंडळ, सासर-माहेर, वडीलधाऱ्यांचा सांभाळ अशा अनेक जबाबदाऱ्या ती सांभाळून ती पार पाडत असते. मात्र या सर्व गोष्टींमध्ये तिच्या तब्येतीची काळजी घेण्याची ती टाळाटाळ करते.ती आहे म्हणून हे विश्र्व आहे ती आहे म्हणून घराला घरपण आहे ती आहे म्हणून नात्यांत जिवंतपणा आहे तिचा सन्मान करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. यावेळी उपस्थित महिलांना आपण नियमित पुस्तकाचे वाचन करावे असे आव्हान करण्यात आले. याप्रसंगी सौ. वैष्णवी चात्रे, सौ. शुभांगी हजारे, सौ. अंजली सूर्यवंशी, सौ. शीला सूर्यवंशी, सौ. निता वडमिले, सौ. त्रिवेणी गोडपटले, सौ. सुवर्णा सूर्यवंशी, सौ. सुवर्णा गायकवाड, सौ. श्रीदेवी वडजे, सौ. अर्चना कुलकर्णी सौ. सिंधू सूर्यवंशी, सौ. वर्षा पांचाळ, सौ. शीला शिंदे इत्यादी सह महिला वाचक बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचा व महिलांचा वाचनालयाच्या वतीने ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना ग्रंथपाल सौ. गोकर्णा सुर्यवंशी यांनी केले. तर आभार प्रदर्शन सचिव सौ. सुवर्णा सूर्यवंशी यांनी केले.


Niture

AGRO TOURISM
निटुरे कृषी पर्यटन, उदगीर
श्री.राजराजेश्वरी मंदीरच्या समोर..

एक दिवसीय ट्रिप साठी गार्डन प्रवेश शुल्क 550रु प्रति व्यक्ती असेल वेळ सकाळी 10:30 ते सायंकाळी 5:30 या मध्ये आपणास खालील सुविधा मिळतील.

चला एकदिवस निसर्गाच्या सानिध्यात

१) सकाळी नाष्टा व चहा किंवा ज्युस
२)दुपारचे जेवण पोट भरुन
३)सायंकाळी चहा/भजे किंवा बिस्कीट
मधल्या वेळेस आपणास मनोरंजना साठी विविध प्रकार चे खेळ कॅरम,चेस क्रिकेट,वॉलीबाल झोका,पाळणा,वाचणयास पुस्तके,रेन डॉन्स, आराम करण्यास बाज,टेंट,आटोळा तेसच बास्केटबॉल,टेनिस बॉल लहाण मुलासाठी बंदुक शॉट रिंगा,बदक,घसरगुंडी,पाळणा,सायकल गाडी बैलगाडी,ट्रॅक्टर फेरी इतर भरपूर,मंदिर दर्शन सेल्फी पॉइंट इत्यादी.

फक्त गार्डन पाहाण्यास 200रु प्रतिव्यक्ती शुल्क आकारल जाईल यामध्ये आपणास नाष्टा व चहा दिला जाईल 3 तासाचा अवधी दिला जाईल

फोटोशुट 1000रु
व्हिडियो करणेसाठी 3000रु
दर आकारला जाईल

35000/- मध्ये सर्व साहित्यासहीत मंगल कार्यालयाची बुकींग चालु आहे.

१)तसेच फॅमिली सहल(एक दिवसीय) २)शाळेची सहल (एक दिवसीय)
३)बर्थडे पार्टी (एक दिवसीय) ४)गेट टुगेदर (एक दिवसीय)
५)कॉलेज सहल (एक दिवसीय) ६)एगेजमेंट पार्टी (एक दिवसीय)
७)लग्नाची पार्टी (एक दिवसीय) ८)लग्नवाढदिवसाची पार्टी (एक दिवसीय)
९)किट्टी पार्टी (एक दिवसीय)

एक दिवस अगोदर बुकिंग करणे अवश्यक आहे.

संपर्क

श्री.राजराजेश्वरी नगर, राजराजेश्वरी मंदीरच्या समोर, मल्लापूर (देगलूर रोड), उदगीर जि.लातूर